NIC - E auction

विभागातंर्गत निर्लेखित वाहेन, रुग्णालयीन आणि शितसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाव्दारे विल्हेवाट लावण्यासाठी NIC कडील ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीचा वापर करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१६/ प्र.क्र.१२१/ आरोग्य-४**
मंत्रालय, १० वा मजला, कॉम्पलेक्स बिल्डींग,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीख: १८ ऑक्टोबर, २०१७.

वाचा

१) **शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.मातंसं-०८०/६/२०१३-DIR-DIT(MH)/३९, दि.३.१२.२०१४**
२) **शासन निर्णय, सा.आ.वि., क्रमांकः खरेदी-२०१२/लिलाव/९६६/प्र.क्र.२१२/आरोग्य-४, दि.२५.०२.२०१५.**
३) **संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र, क्रमांकः संआसे/कक्ष-१५/टे-१/NIC ई-लिलाव प्रस्ताव/न.क्र.१३२३-२४/२०१६, दि.२४.१०.२०१६.**

**शासन निर्णय**

विभागांतर्गत निर्लेखित निकामी वाहने व त्यांचे नादुरुस्त सुटे भाग याची हातची किंमत ठरविण्यासाठी संदर्भाधीन अनुक्रमांक २ च्या शासन निर्णय दि.२५.०२.२०१५ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. तसेच संदर्भ क्र.१ अन्वये विभागाच्या नियंत्रणाखालील विविध आरोग्य संस्थांकडील निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शितसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाव्दारे विल्हेवाट लावण्यासाठी केंद्र शासन अंगिकृत MSTC महामंडळाची नामनिर्देशनाने नियुक्त करण्यास सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान संचालनालय शासन निर्णय दि.३.१२.२०१४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या संदर्भाधीन क्र.३ च्या प्रस्तावानुसार निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शितसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाव्दारे विल्हेवाट लावण्यासाठी शासन खालीलप्रमाणे समित्या पुनर्गठीत करीत आहे.

त्याअनुषंगाने राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC) यांनी विकसित केलेले ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीव्दारे ई-लिलाव कार्यप्रणाली राबविण्यासाठी खालील बाबींना शासन मान्यता देणे आवश्यक राहील.

१) राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC) यांची ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीव्दारे विभागाच्या नियंत्रणाखालील विविध आरोग्य संस्थांकडील निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाव्दारे विक्री करण्यास शासन मान्यता प्रदान करणे.
२) विभागाच्या वतीने उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे यांची मुख्य नोडल अधिकारी म्हणून राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC) यांच्याकडे नोंदणी करण्यास मान्यता प्रदान करणे. तसेच उपसंचालक,

आरोग्य सेवा (परिवहन), पुणे हे विभगांतर्गत ई-लिलाव पध्दतीने संनियंत्रण करणे तांत्रिक सल्ला देणे, ई-लिलावाबाबतच्या माहितीचे संकलन करणे आणि राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC) व क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी/विविध समित्यांमध्ये समन्वय राखणे, इत्यादी करीता आवश्यक कार्यवाही करतील.

३) विभागाच्या क्र.खरेदी-२०१२/९६६/प्र.क्र.२१२/आरोग्य-४, दि.२५.०२.२०१५ अन्वये विभागाच्या नियंत्रणाखालील विविध आरोग्य संस्थांकडील निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची लिलावाव्दारे विक्री करण्यासाठी नामनिर्देशनाने केंद्र शासन अंगिकृत MSTC महामंडळाची केलेल्या नियुक्तीच्या अनुषंगाने शासनाने पुनर्गठीत केलेल्या समित्या खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत.

**(अ) जिल्हास्तरावर निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शितसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांचे लॉट ठरविण्यासाठी समिती**

| | जिल्हा शल्य चिकित्सक स्तर | | | जिल्हा आरोग्य अधिकारी स्तर | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा शल्य चिकित्सक | -अध्यक्ष | १ | जिल्हा शल्य चिकित्सक | -अध्यक्ष |
| २ | सेवा अभियंता/तंत्रज्ञ | -सदस्य | २ | सेवा अभियंता/तंत्रज्ञ | -सदस्य |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | -सदस्य सचिव | ३ | प्रशासकीय अधिकारी | -सदस्य सचिव |

**(ब) अंतिम निर्लेखित वाहने, सुटे भाग, साहित्य यांची हातची किंमत ठरविण्यासाठी समिती**

१) सहाय्यक संचालक (वैद्यकीय), उपसंचालक, विभागीय मंडळ, आरोग्य सेवा - अध्यक्ष
२) सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (परिवहन), - सदस्य
३) मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळ - सदस्य
४) संबंधित जिल्ह्यातील जिल्हा शल्य चिकित्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य
५) सेवा व्यवस्थापक (संबंधित मंडळातील) - सदस्य सचिव

**(क) अंतिम निर्लेखित रुग्णालयीन व शीतसाखळी उपकरणे आणि इतर साहित्य यांची हातची किंमत ठरविण्यासाठी समिती**

१) सहाय्यक संचालक (वैद्यकीय), उपसंचालक, विभागीय मंडळ, आरोग्य सेवा - अध्यक्ष
२) सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (परिवहन), - सदस्य
३) मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळ - सदस्य
४) संबंधित जिल्ह्यातील जिल्हा शल्य चिकित्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य
५) जीव वैद्यकीय अभियंता, आरोग्य साधन सामुग्री दुरुस्ती व देखभाल कार्यशाळा (एचईएमआर) उपसंचालक, आरोग्य सेवा विभागीय मंडळ - सदस्य सचिव

(ड) जिल्हास्तरावरील ई-लिलाव समिती

| | | |
|---|---|---|
| १) | संबंधित जिल्ह्यातील जिल्हा शल्य चिकित्सक/जिल्हा - | - अध्यक्ष |
| २) | सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (परिवहन) | - सदस्य |
| ३) | सेवा अभियंता, आरोग्य सेवा (परिवहन)/तंत्रज्ञ | - सदस्य |
| ४) | संबंधित कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी | - सदस्य सचिव |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१७१६१५५३४९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Pradip M Balkavde
Date: 2017.10.18 11:53:14 +05'30'

**प्र.मो.बलकवडे**
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. महालेखापाल,१/२ महाराष्ट्र( लेखा व लेखापरिक्षा )/ ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई/ नागपूर.
४. आयुक्त, कुटुंब कल्याण आणि संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा ( कुटूंब कल्याण, माता बालसंगोपन व शालेय आरोग्य),पुणे.
७. सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई.
८. सहाय्यक संचालक ( लेखा व लेखापरिक्षा ), आरोग्य सेवा, पुणे.
९. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन ), पुणे.
१०. उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे
११. उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
१२. अवर सचिव (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती( आरोग्य-४ ), सा.आ.वि.

महाराष्ट्र शासन

# उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन), पुणे.

| | | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्र. (वै)<br>(०२०) २६०५८५२५<br><br>आरोग्य सेवा | कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक<br>(०२०) २६०५८३७३<br>(०२०) २६०५८९१२ | उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन),<br>८ केनडी रोड, नायडू हॉस्पीटल कंपाऊंड,<br>पुणे- ४११ ००१ यांचे कार्यालय.<br>कार्यालयीन फॅक्स क्रमांक : (०२०) २६०५८३७८<br>ई-मेल आयडी : ddhs.transport@gmail.com |
| **महत्वाचे परिपत्रक** | जा.क्र.आसेप/तांत्रिक विभाग/कक्ष ११८(१)/निर्लेखित वाहने, साहित्याची हातची किंमत ठरविणे, ई-लिलाव करणे/८८७६-८०५०/२०१७, दिनांक : २८ डिसेंबर, २०१७. | |

प्रति,
उपसंचालक, आरोग्य सेवा,
प्रभारी मंडळ, सर्व.

**विषय :-** **सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील विविध आरोग्य संस्थांकडील निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्यासाठी NIC कडील ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीचा वापर करण्या बाबत ...**

**निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची हातची किंमत निश्चित करणे आणि ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावणे...**

**संदर्भ :-**
१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१६/प्र.क्र. १२१/आरोग्य-४, दिनांक : १८ ऑक्टोबर, २०१७.
२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.आसेप/ तांत्रिक विभाग/ कक्ष ११८(१)/ NIC/ e-Auction Training/८०६३-८१५१/२०१७, दिनांक : १६ नोव्हेंबर, २०१७.
३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.आसेप/ तांत्रिक विभाग/ कक्ष ११८(१)/शानि-NIC/शुध्दीपत्र/७९८१-८३/२०१७, दिनांक : ०९ नोव्हेंबर, २०१७.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत विविध स्तरावरील आरोग्य संस्थांकडे पडून असलेली निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्यासाठी NIC कडील ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीचा वापर करण्यास संदर्भ क्रमांक १ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच ई-लिलाव कार्यप्रणालीचा वापर करण्यासाठी प्रस्तूत शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर लॉट ठरविण्याची समिती, हातच्या किंमती काढण्यासाठीची समिती आणि प्रत्यक्ष ई-लिलाव करण्यासाठीच्या समित्यांचे पुर्नगठण करण्यात आलेले आहे.

आपले मंडळातील अंतिम निर्लेखित वाहने, निरुपायोगी टायर्स-टयुब, बॅटरीज्, सुटे भाग, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची NIC कडील ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीचा वापर करुन ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्यासाठी त्वरीत कार्यवाही करण्यात यावी, हि सस्नेह विनंती.

निर्लेखित वाहने, निरुपायोगी टायर्स-टयुब, बॅटरीज्, सुटे भाग, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्यासाठी संदर्भीय शासन निर्णयान्वये गठित केलेल्या समित्यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

## ➢ अंतिम निर्लेखित साहित्याची हातची किंमत ठरविण्याच्या समितीने करावयाची कार्यवाही :-

१) मंडळातील निर्लेखित वाहने, निरुपायोगी टायर्स-टयुब, बॅटरीज्, सुटे भाग, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य. इत्यादी यांचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात यावा.

२) संदर्भ क्रमांक १ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये आपले मंडळातील निर्लेखित साहित्याची हातची किंमत काढण्यासाठी आपले कार्यालयात कार्यरत सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकिय) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीचे सदस्य सचिव निर्लेखित वाहने, निरुपायोगी टायर्स-टयुब, बॅटरीज्, सुटे भाग यासाठी सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा आणि रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यासाठी जीव वैद्यकिय अभियंता, एचईएमआर, कार्यशाळा हे आहेत. सदर समितीने पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

- सर्व निर्लेखित साहित्य जिल्हा मुख्यालयात / विभागीय स्तरावर / विभागाच्या दृष्टीने सोईच्या सुरक्षित ठिकाणी लॉटनिहाय स्वतंत्र क्रमांकासह ठेवण्याचे नियोजन करावे.
- सर्व निर्लेखित साहित्याच्या अंतिम निर्लेखन आदेशाची स्वतंत्र नस्ती तयार करावी. यात सर्व अंतिम निर्लेखित वाहनांचे आरसीटिसी पुस्तक उपलब्ध करुन ठेवण्यात यावेत.
- वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक डीएफपी १०९१/ प्र.४/ विनियम, दिनांक १८/०६/१९९१ मध्ये लिलावापूर्वी विक्रीच्या वस्तूंची हातची किंमत (अपसेट प्राईस) निश्चित करण्यासाठी ठरविण्यात आलेली तत्वानुसार सदर साहित्याची हातची किंमत, संदर्भीय शासन निर्णयानुसार पुर्नगठीत केलेल्या समितीमार्फत काढण्यात यावी.
- सदर हातची किंमत गोपनियरित्या सिलबंद पाकिटात बंद करुन समितीने आपणाकडे सादर करावी.
- आपणाकडून सदर हातची किंमतीचा लिफाफा तपासून, त्यास मंजूरी देण्यात यावी. हातची किंमत मंजूर केल्यानंतर हातच्या किंमतीची गोपनियता राखण्यासाठी आणि ई-लिलावाची प्रक्रिया त्वरीत होण्यासाठी सदर हातची किंमतीचा लिफाफा सिलबंद करुन गोपनियरित्या संबंधित जिल्हास्तरीय ई-लिलाव समितीकडे हस्तांतरीत करावा.

## ➢ जिल्हास्तरावर अंतिम निर्लेखित साहित्याचे लॉट ठरविण्याच्या समितीने करावयाची कार्यवाही :-

१) सर्व निर्लेखित साहित्याची तपशिलवार माहिती जिल्हास्तरावरील लॉट ठरविण्याच्या समितीने एकत्रित करावी.

२) निरुपयोगी टायर्स-टयूब, बॅटरिज् व निकामी सुटे भाग जिल्हास्तरावर एकत्रित करण्यात यावेत. निरुपयोगी टायर्स-टयुबचा एक लॉट, बॅटरिज्चा एक लॉट व निकामी सुटया भागांचा एक लॉट, अशाप्रकारे जिल्हानिहाय स्वतंत्र लॉट करण्यात यावेत.

३) जिल्हा स्तरावरील आणि विभागीय स्तरावरील कार्यशाळांमध्ये जमा असलेले जळके ऑईल (वंगण) आवश्यकतेनुसार जिल्हा हिवताप कार्यालयास उपलब्ध करुन द्यावे.

४) रुग्णालयीन आणि शीत साखळी उपकरणे व इतर साहित्य शक्य असल्यास जिल्हयात एका ठिकाणी अथवा विभागाच्या दृष्टीने सोईच्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात यावीत.

५) प्रत्येक लॉटमध्ये असलेल्या साहित्याची अचूक संख्या, वजन तपशिलात नमूद करणे आवश्यक आहे.

६) प्रत्येक लॉटवर लॉट क्रमांक सुस्पष्ट अक्षरात रंगविणे किंवा चिकटविणे आवश्यक आहे.

७) लॉट क्रमांक टाकल्यानंतर, लॉट क्रमांक दिसेल अशा पध्दतीने सदर लॉटचे चारही बाजूने (३६०° मध्ये) स्पष्ट रंगीत फोटो घ्यावेत. शक्यतो लॉट जवळ जवळ ठेवू नयेत. जेणे करुन लॉटची विक्री केल्यानंतर लॉट हस्तांतरीत करताना गोंधळ होणार नाही.

## ➤ जिल्हास्तरावरील ई-लिलाव समितीने करावयाची कार्यवाही :-

१) संदर्भ क्रमांक १ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये गठित केलेल्या जिल्हास्तरावरील ई-लिलाव समितीमार्फत ई-लिलावाद्वारे निर्लेखित साहित्याची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२) निर्लेखित वाहने, निरुपयोगी टायर्स-टयुब, बॅटरीज् व निकामी सुटेभाग यासाठी स्वतंत्र ई-लिलाव करण्यात यावा. तसेच रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यासाठी स्वतंत्र ई-लिलाव करण्यात यावा.

३) सोबत जोडलेल्या नमून्यानुसार वृत्तपत्रात प्रसिध्दीकरिता ई-लिलाव सुचना तयार करुन, स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द् करावी. यामध्ये खालीनमूद केल्यानुसार निर्णायक तारखांचे (Critical Dates) वेळापत्रक नमूद करणे आवश्यक आहे (सर्व तारखा कार्यालयीन कामकाजाच्या दिवशीच आणि कार्यालयीन कामकाजाच्या वेळलच असतील याची दक्षता घ्यावी).

- **ई-लिलाव प्रसिध्दीची तारीख व वेळ,**
- **इच्छूक खरेदीदारांचे दस्ताऐवज अपलोड करण्यासाठी सुरुवात करण्याची तारीख** व वेळ,
  (सदर तारीख ई-लिलाव प्रसिध्द् केला त्या दिवाशीच ठेवावी, वेळेत अर्ध्या तासाचा फरक ठेवावा)
- **इच्छूक खरेदीदारांचे दस्ताऐवज अपलोड करण्यासाठीची अंतिम तारीख व वेळ,**
  (सदर तारीख दस्ताऐवज अपलोड करण्यास सुरुवात करण्याच्या तारखेपासून पुढे सात कामाच्या दिवसांनंतरची ठेवावी)
- **अपलोड केलेल्या इच्छूक खरेदीदारांच्या दस्ताऐवजांना मान्यता देण्यास सुरुवात करण्यासाठीची तारीख** व वेळ,
  (सदर तारीख दस्ताऐवज अपलोड करण्यसाठीच्या अंतिम तारखेलाच ठेवावी, वेळेत एक तासाचा फरक ठेवावा)
- **अपलोड केलेल्या इच्छूक खरेदीदारांच्या दस्ताऐवजांना मान्यता देण्यासाठीची अंतिम तारीख व वेळ,**
  (सदर तारीख अपलोड केलेल्या दस्ताऐवजांना मान्यता देण्यास सुरुवात करण्याच्या तारखेपासून पुढे आठ कामाच्या दिवसांनंतरची ठेवावी)
- **ई-लिलावास प्रत्यक्ष सुरुवात होणारी तारीख व वेळ,**
  (सदर तारीख अपलोड केलेल्या दस्ताऐवजांना मान्यता देण्यासाठीच्या अंतिम तारखेच्या लगतच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेस सुरुवात होते तेव्हाची १०.०० ठेवावी)
- **ई-लिलाव संपण्याची तारीख व वेळ,**
  (सदर तारीख प्रत्यक्ष ई-लिलावास सुरुवात झाल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या तिसऱ्या दिवशी, दुपारी १५.०० वाजेपर्यंत ठेवावी).
- **करारनामा (Award of Contract) देण्याची तारीख.**
  (ई-लिलाव समितीने प्राप्त बोलीचे मुल्यांकन करुन सर्वाधिक बोली लावणारा खरेदीदार निश्चित करण्याची कार्यवाही प्रत्यक्ष ई-लिलाव संपल्यानंतर शक्य असल्यास त्याच दिवशी किंवा लगतच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करावी. सर्वाधिक बोली लावणारा खरेदीदार निश्चित झाल्यानंतर, त्याची बोली मान्य केल्याबाबतचा करारनामा **Award of Contract (AOC)** तयार करुन http://eauction.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.

४) ई-लिलावासाठी e-Auction Papers तयार करताना इसारा रक्कम लॉटच्या हातच्या किंमतीच्या १ टक्का एवढी ठेवावी. सदर रक्कम लगतच्या पुढच्या शतकी संख्येएवढी ठेवावी, उदा.लॉटची किंमत रु.१५,०००/- असल्यास इसारा रक्कम रु.१५०/- येते. सदरची रक्कम लगतच्या पुढच्या शतकी संख्येएवढी म्हणजे रु.२००/- एवढी ठेवावी.

५) लॉटच्या बोलीची वाढीची किंमत (Incremental Value) पुढील क्रमानुसार ठेवण्यात यावी.

| अ.क्र. | लॉटची किंमत (Upset Price) | वाढीची किंमत (Incremental Value) |
|---|---|---|
| १ | रु.५०,०००/- पर्यंत | रु.१,०००/- |
| २ | रु.५०,००१/- ते रु.१,५०,०००/- पर्यंत | रु.२,५००/- |
| ३ | रु.१,५०,००१/- ते रु.३,५०,०००/- पर्यंत | रु.४,०००/- |
| ४ | रु.३,००,००१/- ते रु.५,००,०००/- पर्यंत | रु.५,०००/- |
| ५ | रु.५,००,००१/- च्या पुढे | रु.१०,०००/- |

६) NIC कडील ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीचा वापर करण्यासाठी http://eauction.gov.in या संकेतस्थळावर ई-लिलाव प्रसिध्द करण्यासाठी प्रथम सोबत जोडलेल्या नमून्यानुसार **Auction Input Form** भरणे आवश्यक आहे.

७) ई-लिलावासाठी **e-Auction Papers** तयार करण्यासाठीचा नमूना सोबत जोडलेला आहे. सदर नमून्यात कार्यालयनिहाय आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

८) ई-लिलावाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी या कार्यालयामार्फत दिनांक २० व २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी आयोजित केलेल्या प्रशिक्षण सत्रात संबंधित विभागीय व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना NIC मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.तुषार कोळी यांनी संगणकीय सादरीकरण आणि Live e-Auction Demo च्या माध्यमातून आवश्यक माहिती दिलेली आहे. तसेच सदर सादरीकरणाची सॉफ्ट कॉपीही सर्व उपस्थितांस हस्तांतरीत केलेली आहे. तसेच आपल्या विभागातील सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन) आणि जीव वैद्यकिय अभियंता, एचईएमआर कार्यशाळा यांचेकडेही सदर सादरीकरणाची सॉफ्ट कॉपीही उपलब्ध आहे.

९) सदर ई-लिलावाच्या प्रक्रियेदरम्यान काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास NIC मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.तुषार कोळी यांना पुढिल क्रमांकावर संपर्क साधावा ९७०२८६०८५८.

१०) ई-लिलावामध्ये विक्री केलेली वाहने हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर वाहनांचे मालकी हक्क संबंधित खरेदीदाराच्या नावे हस्तांतरीत करण्याची जबाबदारी ई-लिलाव समितीची राहील. त्यासाठी वाहन हस्तांतरण करण्यापूर्वी संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयात फॉर्म नं २८, २९ व ३० पूर्ण भरुन वाहनाचे मालकी हक्क हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करण्याबाबत दक्षता घ्यावी.

११) ई-लिलावाद्वारे विक्री केलेले साहित्य विहित मुदतीत संपुर्ण रक्कम भरल्यानंतर संबंधित खरेदीदारास हस्तांतरीत करावयाची कार्यवाही जिल्हास्तरीय ई-लिलाव समितीमार्फत करण्यात यावी.

१२) ई-लिलावाद्वारे निर्लेखित साहित्याची विक्री झाल्यानंतर प्राप्त होणारी पुर्ण रक्कम शासनाच्या खालील लेखाशिर्षांत जमा करण्यात यावी.

०२१० वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०४ सार्वजनिक आरोग्य
८०० इतर जमा रकमा
(०४) जडवस्तू व इतर वस्तू यांचे विक्रीपासून मिळणारे उत्पन्न
**०२१००६२५**

आपले तात्काळ संदर्भासाठी पुढीलप्रमाणे कागदपत्रे आपणास सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

(अ) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१६/प्र.क्र.१२१/आरोग्य-४, दिनांक : १८ ऑक्टोबर, २०१७.

(ब) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, दिनांक : १८ जून, १९९१.

विषयांकित कार्यवाहीमध्ये कोणतीही अडचण असल्यास या कार्यालयातील सहाय्यक संचालक, श्री.जे. जी.मुळे यांचेशी कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२०-२६०५८३७३/२६०५८३७८ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

तसेच याठिकाणी नमूद करण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत असलेल्या निर्लेखनपात्र वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांचे अंतिम निर्लेखनाचे आदेश काढण्याची कार्यवाही लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीनेही नियोजन करण्यात यावे, ही विनंती. जेणेकरुन सदर साहित्य अंतिम निर्लेखित केल्यानंतर, सदर साहित्याची ई-लिलावाद्वारे विक्री करणे शक्य होऊन, सदर साहित्याने व्यापलेली आरोग्य संस्थांची जागा रिकामी होईल.

कृपया विषयांकित कार्यवाहीस प्रथम प्राधान्य देण्यात यावे, हि सस्नेह विनंती.

(वि. ए. गायकवाड)
उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन),
पुणे-४११ ००१.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३) मा.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

प्रत :- सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकिय), कार्यालय उपसंचालक, प्रभारी मंडळ सर्व तथा अध्यक्ष, हातची किंमत ठरविण्याची समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा/सामान्य रुग्णालय, सर्व तथा अध्यक्ष, लॉट ठरविण्याची समिती आणि अध्यक्ष जिल्हास्तरावरील ई-लिलाव समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सर्व तथा अध्यक्ष, लॉट ठरविण्याची समिती आणि अध्यक्ष, जिल्हास्तरावरील ई-लिलाव समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), सर्व तथा सदस्य सचिव, हातची किंमत ठरविण्याची समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- जीव वैद्यकिय अभियंता, एचईएमआर कार्यशाळा, कार्यालय उपसंचालक, प्रभारी मंडळ सर्व सदस्य सचिव, हातची किंमत ठरविण्याची समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- प्रशासकीय अधिकारी, जिल्हा/सामान्य रुग्णालय, सर्व तथा सदस्य सचिव, लॉट ठरविण्याची समिती आणि सदस्य सचिव, जिल्हास्तरावरील ई-लिलाव समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- प्रशासकीय अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सर्व तथा सदस्य सचिव, लॉट ठरविण्याची समिती आणि सदस्य सचिव, जिल्हास्तरावरील ई-लिलाव समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

GH, SDH, RH - जडवस्तू ले


आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय, आवार, पी.डिमेलो रोड,मुंबई-४०० ००१.

| | दूरध्वनी | Website :http://maha-arogya.gov.in |
|---|---|---|
| कार्यालय | २२६२१०३१-३६ | Email:dhs_2005@rediffmail.com |
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | Email:miscell@rediffmail.com |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६११४७१ | Fax No.022-22611034 22620234(DHS), 022-22679044 (Hosp.) |
| सहसंचालक (प्राआकें-जिल्हास्तर) | २२६२०२४९ | 022-22622155 (CAO) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२११८६ | 022-22703785 (Control Room) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | 022-22621047 (NCD) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६१६७५५ | 022-22625799 (Procurement Cell) |


| | | |
|---|---|---|
| **महत्वाचे व तातडीचे परीपत्रक** | | प्र.संआसे/जडसंग्रह वस्तु.निर्लेखन/परिपत्रक/क-३/२०१४<br>दिनांक:-११/०८/२०१४ |

प्रति,

प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर.

प्राचार्य, आरोग्य कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, विभागीय मंडळ (सर्व),

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग) विभागीय मंडळ, (सर्व).

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय) (सर्व).

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) (सर्व).

अधिक्षक, सामान्य रुग्णालय, औंध, पुणे.

जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व).

जिल्हा क्षयरोग /हिवताप/हत्तीरोग अधिकारी (सर्व).

वरीष्ठ वैज्ञानिक अधिकारी नागपूर

वैद्यकीय अधिक्षक, मानसिक आरोग्य संस्था, पुणे /ठाणे / नागपूर / रत्नागिरी

वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय / ग्रामीण रुग्णालय / स्त्री रुग्णालय (सर्व).

**विषय :-जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखित करुन, जाहिर लिलावाव्दारे विक्री करणे इत्यादी बाबत करावयाची कार्यवाही......**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांकः-डीएफपी १०९.१/प्र. ४/विनियम, मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक १८/६/१९९१.

२) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक.विअप्र-१०.०८/प्र.क्र. ७०/२००८/विनियम, दि. १५ मे २००९.

३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र. खरेदी १००७/प्र.क्र.६१/ / आरोग्य -८/ मंत्रालय, मुंबई -३२ दि. ८ डिसेंबर, २००७.

४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. खरेदी/२००९/प्र.क्र. ८७/आरोग्य-८ मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक १६ नोव्हेंबर, २००९

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्यातील सर्व स्तरावरील कार्यालये /रुग्णालये (ग्रामीण रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये क्षयरोग रुग्णालये, प्रादेशिक मनोरुग्णालये, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा इ ) या मध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणामध्ये निर्लेखनपात्र, दुरुस्त न होण्या सारख्या **जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू** विनावापर

पडून आहेत. यामुळे कार्यालयातील /रुग्णालयातील बऱ्याच मोठया प्रमाणात जागा व्यापली आहे. तसेच यामुळे अनेक समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी या वस्तूंची लवकरात लवकर विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने आपले अंतर्गत कार्यालयातील व सर्व आरोग्य संस्थांमधिल निरुपयोगी, निर्लेखनपात्र, दुरुस्त न होण्यासारख्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखित करणे, अंतिम निर्लेखित जडसंग्रह वस्तू जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे इत्यादी बाबत पुढील प्रमाणे कार्यवाही आपले स्तरावरुन तातडीने करण्यात यावी.

**(अ) विनावापर, निर्लेखनपात्र आणि दुरुस्त न होण्यासारख्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू यांची यादी तयार करणे** :-सर्व आरोग्य संस्था प्रमुखांनी आपल्या आरोग्य संस्थेतील जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची यादीमहाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक दिनांक २८ फेब्रुवारी १९६७ व दिनांक १८-६-१९९१ अन्वयेप्रशासकीय अधिकारी, कार्यालयीन अधिक्षक, सहाय्यक अधिक्षक आणि संबंधित भांडार नोंदवही हाताळणारा लिपिक यांच्या सहाय्यानेपुढील प्रपत्र मध्ये तयार करावी.

**यादया तयार करण्या बाबतची कार्यवाही आरोग्य संस्था प्रमुखांनी १५ सप्टेंबर, २०१४ पर्यंत पुर्ण करावी.**

प्रपत्र

| अ क्र. | आरोग्य संस्थेचे नाव | निर्लेखन पात्र जडसंग्रह वस्तूचे नाव | संख्या | प्राप्त दिनांक | साठा पुस्तक क्रमांक व पान क्रमांक | खरेदी किमंत | घसारा किमंत | जडवस्तु उपकरणाची सद्य:स्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

**(आ-१) निर्लेखन पात्र जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखन करण्यासाठीचे अभिप्राय:-जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखन** करण्यासाठीचे अभिप्राय शेरा या कॉलम मध्ये नमुद करण्यात यावेत. उदा:- १) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू तुटलेल्या आहेत. २) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूजुन्या असल्याने वारंवार दुरुस्ती करावी लागते. ३) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूंची दुरुस्ती समाधानकारित्या होऊ शकत नाही. ४)जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूच्या दुरुस्तीसाठी खरेदी किंमतीच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त खर्च अपेक्षित आहे.

**(आ-२) निर्लेखन पात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचा घसारा किंमत काढणेची पद्धत**:-महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक : डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक.१८/६/१९९१. च्या परिपत्रकासोबत दिलेल्या सहपत्र - महाराष्ट्र पब्लिक वर्क्स मॅन्युअलच्या परिच्छेद- ४१५ च्या नुसार निर्लेखन पात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचा घसारा काढण्याचा दर निश्चित करावा आणि पुढील पद्धती नुसार उपकरणाची घसारा किंमत संबंधित संस्था प्रमुखांच्या स्तरावर काढण्यात यावी.

**Example**

- The rates of the depreciation for various categories are as follows :-

1. Plants,and machinery :- 10%

When the annual valuation of the article reaches ten percent of original cost, no depreciation need be charged. In other words, the residual value of the article is to be fixed at10% of the Original cost beyond which depreciation not to be charged. The following example will illustrate, as to how to calculate depreciation on straight line method.

The original cost of article is Rs.100. Residual value is Rs.10 (10% of original cost) Rate of depreciation is 10%. It means estimated life is 10 years.

**Depreciation :- Cost of Article – Residual value**

$$= \frac{\text{Cost of Article – Residual value}}{\text{Estimated life}} = \frac{100-10}{10} = \frac{90}{10} = 9 \text{ (One year)}, = (9 \times 10 = 90) \text{ (Dep.} = 100-90 = 10)$$

**Yearly depreciation would be Rs.9. Asset to be depreciated for 10 years (9x10) Thereafter residual value of Rs.10 is not be depreciated.Thus the written down value of Rs.10 of the article needs to be written off.**

**(इ)१) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखना साठी मंडळस्तरीय निर्लेखन समितीची मान्यता बंधन कारक राहील. मंडळ उपसंचालक स्तरावरील समिती मध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे. प्रशासकीय सोयीसाठी सहाय्यक संचालक (वैद्यकीय) / मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना नोडल ऑफिसर म्हणून नेमण्यात येत आहे**

| | | |
|---|---|---|
| सबंधित मंडळातील सहाय्यक संचालक (वैद्यकीय) | - | अध्यक्ष |
| सबंधित मंडळ कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य |
| सबंधित मंडळातील जीव वैद्यकीय अभियंता (एचईएमआर) | - | सदस्य सचिव |

२) आरोग्य संस्था प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली उपकरणे निर्लेखना बाबत छानणी समिती गठित करण्यातयावी.

३) छानणी समिती मध्ये संबंधित आरोग्य संस्थेतील खालील नमुद केल्या प्रमाणे सदस्यांचा समावेशअसावा.

सामान्य रुग्णालय :-छानणी समिती सदस्य,

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हा शल्य चिकित्सक | - | अध्यक्ष |
| २) अतिरिक्तजिल्हा शल्य चिकित्सक / निवासी वैद्यकीय अधिकारी( बाह्य संपर्क) | - | सदस्य |
| ३) वैद्यकीय अधिकारी | - | सदस्य |
| ४) मुख्य प्रशासकीय अधिकरी / प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य |
| ५) अधिसेविका | - | सदस्य |
| ६) भांडार पाल | - | सदस्यसचिव |

उप जिल्हा रुग्णालय /ग्रामीण रुग्णालय :-छानणी समिती सदस्य,

| | | |
|---|---|---|
| १) वैद्यकीय अधिक्षक | - | अध्यक्ष |
| २) वैद्यकीय अधिकारी | - | सदस्य |
| ३) औषध निर्माण अधिकारी | - | सदस्य |
| ४) सहाय्यकअधिसेविका / परिसेविका / इन्चार्ज अधिपरिचारिका | - | सदस्य |
| ५) सहाय्यक अधिक्षक / भांडार पाल / वरिष्ठ लिपिक | - | सदस्य सचिव |

इतर आरोग्य संस्था, कार्यालये :-छानणी समिती सदस्य,

| | | |
|---|---|---|
| १) कार्यालय / संस्था प्रमुख | | |
| २) वैद्यकीय अधिकारी | - | अध्यक्ष |
| ३) मुख्य प्रशासकीय अधिकारी / प्रशासकीय अधिकारी / अधिक्षक / महा.अधिक्षक | - | सदस्य |
| ४) भांडार लिपिक | - | सदस्य |
| | - | सदस्यसचिव |

(ई) ग्रामीण रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, क्षय रुग्णालये, यांनी त्यांच्या कडील छानणी समितीने जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखनासाठी प्रस्तावित करुन संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक यांचे मार्फत अंतिम निर्लेखनासाठी मंडळ स्तरावरील गठित समिती कडे निर्लेखनासाठी प्रस्तावित करावीत. रुग्णालये वगळून जिल्हया मधिल इतर सर्व कार्यालयांनी त्यांचे कार्यालयातील छानणी समितीने जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखनासाठी प्रस्तावित करुन थेट मंडळ स्तरावरील गठित समिती कडे निर्लेखनासाठी प्रस्तावित करावीत. मंडळस्तरावरील गठित निर्लेखन समितीने मंजूरी दिल्यानंतर जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश निर्गमित करावेत.

(प्रशासकीय सोयीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडील निवासी वैद्यकीय अधिकारी ( बाहय संपर्क ) आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी / प्रशासकीय अधिकारी यांना नोडल ऑफिसर म्हणून नेमण्यात येत आहे)

मंडळ उपसंचालक स्तरावरील समिती मध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| सबंधित मंडळातील सहाय्यक संचालक (वैद्यकीय) | - | अध्यक्ष |
| सबंधित मंडळ कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य |
| सबंधित मंडळातील जीव वैद्यकीय अभियंता (एचईएमआर) | - | सदस्य सचिव |

मंडळ स्तरावर प्रशासकीय सोयीसाठी सहाय्यक संचालक (वैद्यकीय) / मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना नोडल ऑफिसर म्हणून नेमण्यात येत आहे

प्रस्तावास संबंधित मंडळ उपसंचालकांच्या मंजूरी बाबतची कार्यवाही आरोग्य संस्था प्रमुखांनी १५ ऑक्टोबर, २०१४ पर्यंत पुर्ण करावी.

उ) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू चे निर्लेखन आदेश काढणे :-

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला उप विभाग क्रमांक १ ते ५, शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वि.अ.प्र.-१० ०७/प्र.क्र.३०/२००८/विनियम, दिनांक १५ मे २००९ मधील भाग पहिला उप विभाग १ मधील अ.क्र. २३, नियम क्रमांक १४६ अन्वये जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखित करण्याचे अधिकार प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.विभाग प्रमुखाला प्रत्येक प्रकरणी ( प्रत्येक प्रकरण म्हणजे एका उपकरणाची मुळ खरेदी किंमत) रु. १,००,०००/- पर्यंत उपकरणे निर्लेखित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. प्रादेशिक

कार्यालय प्रमुख यांना प्रत्येक प्रकरणी रु. ६०,०००/- पर्यंत उपकरणे निर्लेखित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत आणि कार्यालय प्रमुखाला रु. ३०,०००/- पर्यंत उपकरणे निर्लेखित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. या अधिकारानुसार आपल्या आरोग्य संस्थेमधिल निर्लेखन पात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचेनिर्लेखन आदेश काढून निर्लेखनाची कार्यवाही पुर्ण करावी.

१) रु. ३०,०००/- पर्यंत किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश कार्यालय प्रमुखांनी काढावेत.

२) रु. ६०,०००/- पर्यंत किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश काढण्याचे अधिकार प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांना आहेत त्यामुळे कार्यालय प्रमुखांनी रु.३०,०००/- ते ६०,०००/- पर्यंतच्या प्रत्येक प्रकरणी मूळ खरेदी किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे सविस्तर प्रस्ताव मंडळ उपसंचालक यांना पाठवून अंतिम निर्लेखन आदेश प्राप्त करुन घ्यावेत

३) रु.६०,०००/- ते रु. १,००,०००/- पर्यंत किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश काढण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांना आहेत त्यामुळे कार्यालय प्रमुखांनी रु.६०,०००/- ते १,००,०००/- पर्यंतच्या प्रत्येक प्रकरणी मूळ खरेदी किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे सविस्तर प्रस्ताव मंडळ उपसंचालक यांचे मार्फत मा.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना पाठवून अंतिम निर्लेखन आदेशप्राप्त करुन घ्यावेत व सदर प्रस्तावा मधिल निर्लेखित जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे विक्री बाबत मा. संचालक यांची मंजूरी घ्यावी.

४) कार्यालय प्रमुखांनी रु.१,००,०००/- पेक्षा जास्त किंमत असलेल्या निर्लेखनपात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूंची ( प्रत्येक प्रकरणी) अंतिम यादी तयार करावी. सदर यादी मंडळ उपसंचालक स्तरावरील गठित निर्लेखन समिती मार्फत छाननी करुन अंतिम यादी मंडळ उपसंचालक यांचे मार्फत आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना सादर करावी. सदर यादीतील अंतिम निर्लेखनपात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे प्रस्ताव शासनास पाठवून, शासनाकडून अंतिम जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

## (ऊ)अंतिम निर्लेखित जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची हातची (अपसेट प्राईस) किंमत निश्चित करणे :-

१) अंतिम निर्लेखित जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूंची हातची किंमत काढण्यासाठी संस्था प्रमुखाच्या अध्यक्षते खाली कार्यालयातील राजपत्रीत अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात यावी या समिती मध्ये प्रशासन / लेखाविषयक कार्यभार असणाऱ्या अधिकाऱ्याचा समावेश असावा. समिती मध्ये किमान तीन सदस्यांचा समावेश असावा

२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक:-डीएफपी १०९१/प्र ४/विनियम, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक १८/६/१९९१.मधिल मुद्दा क्र. ३ मधिल अ, ब, किंवा क नुसार काळजीपुर्वक हातची किंमत निश्चित करावी.यानुसार समितीने निर्लेखित जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची हातची किंमत काढण्याची कार्यवाही करावी.

३) सदर हातची किंमत सिलबंद लिफाफा करुन संबंधित संस्था प्रमुखांनी मंडळ उपसंचालक यांच्या मंजूरीसाठी सादर करावी.सोबत आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

४) मंडळ उपसंचालक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन अंतिम निर्लेखित जडसंग्रहातील वस्तूंच्या हातच्या किंमतीस मंजुरी द्यावी.

५) संस्था प्रमुखांनी सदर हातची किंमत पुन्हा सिलबंद लिफाफा करुन मंडळ उपसंचालक यांचे कडे सुरक्षित ठेवण्यात यावी.

**जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची हातची (अपसेट प्राईस) किंमत काढणे व संबंधित मंडळ स्तरावरील समितीने मंजूरी बाबतची कार्यवाही १५ नोव्हेंबर, २०१४ पर्यंत पुर्ण करावी.**

(ए) आरोग्य संस्था प्रमुखाने अंतिम निर्लेखित जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूचीविक्री करणेपुर्वी पुढील प्रमाणे प्रमाण पत्र लिलाव समिती अध्याक्षांकडे सादर करावयाचे आहे. तसेच एक प्रत प्रस्तावा बरोबर ठेवणेची आहे:-

"प्रमाणित करण्यात येते की, ——— मंडळातील , ——— जिल्हयामधिल ———————या आरोग्य संस्थे मधिल एकूण —— नग अंतिम निर्लेखित जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूआहेत. या पैकी — नग विक्रीसाठी प्रस्तावित आहेत. या सर्व जडसंग्रह वस्तूबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देत आहे."

१) या सर्व जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूचेमर्व ॲंगलनी फोटो काढलेले आहेत.

२) या सर्व जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूवर कोणत्याही स्वरुपाचा , कोणत्याही पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल नाही.

३) या सर्व जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूवर कोणत्याही न्यायालयात कसल्याही स्वरुपाचे प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

४) या सर्व जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूवर संबंधित कंपनीच्या उत्पादकाचा /त्याचा अधिकृत विक्रेता यांचाकोणत्याही स्वरुपाचा (उपकरणाचा निकृष्ठ दर्जा, सदोष पुरवठा इत्यादी- इत्यादीबाबत )दावा संस्था प्रमुखांकडे प्रलंबित अथवा न्यायप्रविष्ठ नाही.

५) सर्व जडसंग्रह वस्तूसंबंधी कोणीही माहितीच्या अधिकारात माहीती मागीतलेली नाही.

(ऐ) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू विक्री बाबत महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक:-डीएफपी १०९१/प्र.८/विनियम. मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक १८/६/१९९१.मधिल मुद्दा क्र.५ मधिल (एक) व (दोन) नुसार कार्यवाही करावी.

(एक) संबंधित प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील एका जिल्हयातील विविध स्थानिक कार्यालयाच्या एका अर्थिक वर्षात विक्री करावयाच्या सर्व वस्तूंची एकूण हातची किंमत रु.५०००/- पेक्षा जास्त नसेल तेव्हा त्या विभागाच्या जिल्हा पातळीवरील कार्यालय प्रमुखाने अशा सर्व कार्यालयाच्या वस्तूंचा लिलाव स्थानिक पातळीवर करावा. लिलावाच्या प्रसिध्दीची व्याप्ती , हातची किंमत , इत्यादी बाबतवित्त विभागाच्या दिनांक १८/६/१९९१ च्या परिपत्रकातील परिच्छेद २ व ३ मध्ये नमुद केलेल्या तत्वानुसार निर्णय घेण्यास जिल्हा पातळीवरील कार्यालय प्रमुख अशा प्रकरणा मध्ये सक्षम असतील.

(दोन) · कोठल्याही एका प्रशासकीय विभागाच्या एका जिल्हयातील विविध स्थानिक कार्यालयांच्या एका आर्थिक वर्षात विक्री करावयाच्या सर्व वस्तूंची एकूण हातची किंमत रु. ५०००/- पेक्षा जास्त असेल तेव्हा लिलावाच्या प्रसिध्दीची व्याप्ती , हातची किंमत, लिलावाचे स्थळ व दिनांक इत्यादी बाबत निर्णय घेण्या करीता एक समिती नियुक्त करण्यात यावी. संबंधित विभागाच्या नियंत्रणा खालील जेष्ठतम प्रोदेशिक विभाग प्रमुख हे अशा समितीचे अध्यक्ष असावे. व संबंधित विभागाने निवडलेले अन्य दोन अधिकारी समितीचे सदस्य असावेत. समितीने घेतलेल्या निर्णयानुसार लिलाव पार पाडण्याची व्यवस्था जेष्ठतम विभाग प्रमुखाने करावी.

आरोग्य विभागात राज्यस्तरावरील आरोग्य संस्थांची संख्या जास्त आहे. त्यामुळे सर्व वस्तूंची हातची किंमत रु ५०००/- पेक्षा जास्त राहणार आहे. ही बाब विचारात घेऊन जेष्ठतम प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणजेच विभागीय उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येत आहे. त्यात पुढील सदस्यांचा समावेश राहील.

| | | |
|---|---|---|
| १) उपसंचालक विभागीय मंडळ | - | अध्यक्ष |
| २) सहाय्यक संचालक (वैद्यकीय) | - | सदस्य |
| ३) मुख्य प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य |
| ४) संबंधित जिल्हयाचे जिल्हा शल्य चिकित्सक | - | सदस्य |
| ५) जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील मुख्य /प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य सचिव |

ओ) प्रत्यक्ष लिलावानंतर खरेदीदाराने साहित्याची उचल केल्यानंतर साठासंग्रह नोंदवहीत तशी नोंद घेऊन साहित्य कमी करण्यात यावे.

सोवत : वरीलप्रमाणे

संचालक,
आरोग्य सेवा, मुंबई.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(कुटुंब कल्याण) पुणे.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(सामाजिक बांधिलकी) मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(मानसिक आरोग्य) मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(एडस्) मुंबई.
सह संचालक, आरोग्य सेवा(हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे.
सह संचालक, आरोग्य सेवा(कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा(प्रभारी मंडळ) सर्व.

२/- आपले स्तरावरुन संबंधित संस्थाप्रमुखांना वरीलप्रमाणे कार्यवाही मे २०१[illegible] अखेर पूर्ण करण्याबाबत उचित निर्णय देण्यात यावेत सदर वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
उपसंचालक, आरोग्य सेवा( आय ई सी ब्युरो ) पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा( आमाजिआ ) पुणे.

उपसंचालक, आरोग्य सेवा(रा आ प्र शा) सर्व.
उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन) पुणे.
प्रत कार्यवाहीसाठी
जीव वैद्यकीय अभियंता, विभागीय आरोग्य साधन सामुग्री देखभाल व दुरुस्ती कार्यशाळा, सर्व

२/- परिपत्रकामध्ये नमूद कार्यवाही लवकरात लवकर करण्यासाठी मंडळातील आरोग्य संस्थाप्रमुखांना आवश्यक सहकार्य करण्यात यावे.

**(आ-२) निर्लेखन पात्र रुग्णालयीन उपकरणे यांची घसारा किंमत काढणेची पद्धत**:-महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक : डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक.१८/६/१९९१. च्या परिपत्रकासोबत दिलेल्या सहपत्र - महाराष्ट्र पब्लिक वर्क्स मॅन्युअलच्या परिच्छेद- ४१५ च्या नुसार निर्लेखन पात्र रुग्णालयीन उपकरणे यांची घसारा काढण्याचा दर निश्चित करावा **आणि पुढील पद्धती नुसार उपकरणाची घसारा किंमत संबंधित आरोग्य संस्था** प्रमुखांच्यास्तरावर काढण्यात यावी.

<u>Example</u>

- The rates of the depreciation for various categories are as follows :-

1. Plants.and machinery :- 10%

When the annual valuation of the article reaches ten percent of original cost, no depreciation need be charged. In other words, the residual value of the article is to be fixed at10% of the Original cost beyond which depreciation not to be charged. The following example will illustrate, as to how to calculate depreciation on straight.line method.

The original cost of article is Rs.100, Residual value is Rs.10 (10% of original cost)

Rate of depreciation is 10%. It means estimated life is 10 years.

**Depreciation :- Cost of Article – Residual value**

$$\frac{\textbf{Cost of Article – Residual value}}{\textbf{Estimated life}}$$

$$= \frac{100-10}{10} = \frac{90}{10} = 9 \text{ (One year)}, = (9x10 = 90) \text{ (Dep. = 100-90 = 10)}$$

**Yearly depreciation would be Rs.9. Asset to be depreciated for 10 years (9x10) Thereafter residual value of Rs.10 is not be depreciated.Thus the written down value of Rs.10 of the article needs to be written off.**

(इ) निरुपयोगी, विनावापर, निर्लेखपात्र आणि दुरुस्त न होण्यासारख्या रुग्णालयीन उपकरणे निर्लेखित करताना विचारात घ्यावयाच्या बाबी :-

१) निर्लेखन करते वेळी रुग्णालयीन उपकरणांचे आयुर्मान किमान दहा वर्षे असले पाहीजे.

( महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.खरेदी १००७/प्र.क्र.७१/ / आरोग्य -८/ मंत्रालय, मुंबई -३२, दि.४ डिसेंबर,२००७. अन्वये)

२) रुग्णालयीन उपकरणे निर्लेखना साठी मंडळस्तरावरील निर्लेखन समितीची मान्यता बंधन कारक राहील.

**३)जिल्हा परिषद मुख्यालयात जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षते खाली**

निरुपयोगी, दुरुस्ती न होण्याजोग्या अथवा गरजेपेक्षा अतिरिक्त असलेल्या शासकीय भांडार वस्तू, यंत्रसामुग्री, वाहने इत्यादींची लिलावाने विक्री करण्याची व्यवस्था.

## महाराष्ट्र शासन
### वित्त विभाग
### शासन परिपत्रक क्रमांकः डीएफपी-१०१६/प्र.क्र.०७/१६/ विनियम

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: २२ जून, २०१६

वाचा :

१) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांकः डीएफपी-१०६१/१२१९५/७, विनियम, दि.२८.६.१९६२.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: डीएफपी-१०९१/प्र.४/विनियम, दि.१८.६.१९९१.
३) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांक: विअप्र-१०००/प्र.क्र.३१/२००१/विनियम, दि.१५.६.२००१.

परिपत्रक :

निरुपयोगी, उपयोगात नसलेल्या किंवा गरजेपेक्षा अधिक असलेल्या भांडारवस्तूंचे निर्लेखन करणे व त्यांची विक्री करणे याबाबत सूचना संदर्भीय क्र.२ च्या शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, दि.१८.६.१९९१ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये संदर्भीय क्र.३ च्या शासन परिपत्रकान्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. कालानुरुप सदर परिपत्रकातील काही तरतूदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१. प्रशासकीय विभागांनी निरुपयोगी व दुरुस्त न होण्याजोग्या वाहनांच्या विक्री संदर्भात संदर्भाधिन शासन परिपत्रक दिनांक १८.०६.१९९१ मधील कार्यपध्दत अवलंबावी.

२. हातची किंमत रु.५०,०००/- पेक्षा जास्त असेल तेव्हा संदर्भाधीन दि.१८.०६.१९९१ च्या शासन परिपत्रकामधील परि.५ (एक) नुसार वृत्तपत्रात निविदा मागविणारी किंवा लिलावाची जाहिरात दयावी. तसेच, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर ही जाहिरात देण्यात यावी. तथापि, हातची किंमत रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यास लिलावाच्या नोटिशीची किंवा निविदा मागविणारी जाहिरात कार्यालय प्रमुखाने महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर देणे पुरेसे असेल.

३. हातच्या किंमतीपेक्षा निविदेची / लिलावाची किंमत कमी येत असेल तर विभाग प्रमुखाने एक महिन्यांचे आत पुन्हा जाहिरात देऊन निविदेची / लिलावाची पुनर्प्रक्रीया करावी. तद्नंतरही आलेली किंमत जर हातच्या किंमतीपेक्षा कमी येत असेल तर विभाग प्रमुखांनी प्रशासकीय विभागाच्या सल्ल्याने निविदा स्विकारावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१६०६२११११११३६३९०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Bhaskar Ringane

Digitally signed by Narayan Bhaskar Ringane
DN: CN = Narayan Bhaskar Ringane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2016.06.22 10:56:30 +05'30'

(ना.भा.रिंगणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. * प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा))-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
२. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
३. * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
४. * महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
५. * राज्यपालांचे सचिव
६. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
७. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
८. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९. अपर मुख्य सचिव, राज्य निवडणूक आयोग.
१०. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभाग
११. राज्य निवडणूक आयोग.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१६. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकणभवन, नवी मुंबई
१७. * प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
१८.* प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
१९.* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मुंबई
२०.* प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२१.* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२२.* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय मादाम कामा रोड, मुंबई
२३.* प्रमुख न्यायाधिश, कुटुंब न्यायालय, नागपूर / मुंबई, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१
२४. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली .

२५. उप संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग,कोकण भवन,नवी मुंबई/पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक / अमरावती
२६. उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा,कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद / नाशिक/ अमरावती
२७. सर्व उप कोषागार अधिकारी
२८. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख
२९. सर्व विभागीय आयुक्त
३०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३१. सर्व जिल्हाधिकारी
३२. महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१
३३. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३५. सर्व जिल्हा परिषदांचे अर्थ विभागातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी
३६. संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८, स्टेट एम्पोरिया इमारत, बाबा खरकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११०००१
३७. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
३८. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर,वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२०,
३९. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही,पटेल रोड, मुंबई-४०० ००४
४०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई
6) वरील प्रमाणे ठरविलेल्या अपेक्षित किंमतीवर निर्लेखित केलेली उपकरणे घेण्याचा प्रथम हक्क निर्लेखनापुर्वी ती उपकरणे ज्यांच्या वापरात होती त्यांचाच राहिल. याबाबतचे आदेश संबंधित विभागातील सक्षम अधिकारी निर्गमित करतील. मात्र ज्या उपकरणाचा वापर एका व्यक्तिकडून होत नसुन पूर्ण विभागासाठी होत असेल अशा उपकरणाचा हक्क संबंधित विभागातील अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव ठरवतील. ज्या अधिकारी /कर्मचारी यांना प्रथम हक्क देण्यात आला व त्यांनी उपकरणे घेण्यास लेखी नकार दिल्यास त्याबाबतचा हक्क संबंधित विभागांनी त्यांच्या विभागातील इतर अधिकारी/कर्मचारी यांना लेखी आदेश काढून द्यावा अथवा या उपकरणांना उच्च व तंत्रशिक्षण विभागा अंतर्गत असलेल्या शासकीय शैक्षणिक संस्थांना ज्या सदर सामुग्री घेण्यास तयार असतील अशा शैक्षणिक संस्थांना प्राधान्य देण्यात यावे व तद्नंतर आवश्यकता भासल्यास त्याची विल्हेवाट लावण्याचा पुर्ण अधिकार त्या शैक्षणिक संस्थेस राहिल. तंत्रशिक्षण संस्थांनी सदर साहित्याचा वापर शैक्षणिक कामाकरीता करावा. ही उपकरणे घेण्यास अधिकारी/कर्मचारी किंवा तंत्रशिक्षण संस्था देखील तयार नसतील तर निविदा पध्दतीने त्याची विल्हेवाट संबंधित विभागाने करावी.

7) मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील ज्या अधिकारी/ कर्मचा-यांना उपकरणे घेण्याचा प्रथम हक्क देण्यात आला आहे, त्यांनी उपकरणाची निर्धारित किंमत त्यांचे विभागाच्या रोख शाखेत भरावी. संबंधित रोखशाखा सदर रक्कमेचा भरणा एकत्रितरित्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या रोखशाखेत करून तसे प्रमाणपत्र घेतील. रक्कमेचा भरणा केल्यानंतर संबंधित विभागाच्या रोख शाखा मंत्रालय तसेच नविन प्रशासन भवनातील संगणक व तदुषंगीक बाबींची दुरुस्ती व देखभाल करणा-या संस्थेच्या प्राजेक्ट मॅनेजर यांचेशी संपर्क साधून सदर उपकरणातील शासनाची आवश्यक माहिती व सर्व आज्ञावल्या काढून घेण्यासाठी कार्यवाही करतील आणि त्या आशयाचे प्रमाणपत्र संबंधिताकडुन घेतील. त्यानंतर ते उपकरण संबधितांना आहे त्या स्थितीत हस्तांतरीत करतील आणि त्याच्या गेटपास बाबत आवश्यक ती कार्यवाही करतील. क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांबाबत वरील प्रमाणे कार्यवाही संबधित सक्षम अधिका-याकडून तांत्रिक समितीचे गठण करुन करण्यात यावी.

8) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना पुरविलेल्या संगणक व तदनुषंगिक बाबींच्या विक्रीतुन प्राप्त झालेल्या रक्कमेचा भरणा माहिती तंत्रज्ञान संचालनालयातील रोख शाखा, योग्य शीर्षाखाली शासकीय कोषागारात चलनाने करतील. क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांनी याबाबत त्यांचे स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

9) विक्रीस घेतलेले उपकरण संबंधितांना हस्तांतरित करीत असताना सदर उपकरणास काही दोष उद्भवल्यास त्याबाबत विभागाची जबाबदारी राहणार नाही व वाहतुक आणि जकात इत्यादी बाबतचा खर्च संबंधितांना करावा लागेल असे स्पष्ट नमूद करावे.

10) संबंधित विभागाच्या आस्थापना शाखेने/संगणक शाखेने जड वस्तू संग्रह नोंद वहीत सदर विक्रीबाबत नोंद घ्यावी.

11) वरील धोरण सर्व क्षेत्रिय कार्यालयीन व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील आस्थापनांनाही लागु राहील.

सदर शासन निर्णय मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील असलेल्या उच्चाधिकार समितीला शासन निर्णय सीओएम1098/प्र.क्र.212/98/39, दिनांक 5 ऑक्टोबर2001 व दि. 5 ऑक्टोबर 2002 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये व दि.1 जुलै, 2011 रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

या शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संगणक सांकेतांक 201108011717200001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.ह.जाधव)
उप सचिव तथा संचालक,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळशाखा) मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, (विधान परिषद / विधान सभा), मुंबई,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/लेखा कोष भवन वांद्रे (पू.) मुंबई,
निवासी व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हापरिषद / महानगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई-400004, संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री, मुंबई,
विशेष आयुक्त व प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, कोपरनिकस मार्ग, नवी दिल्ली
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती (2 प्रती).

आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय, आवार, पी.डिमेलो रोड,मुंबई-४०० ००१.

| कार्यालय | दुरध्वनी २२६२१०३१-३६ | Website :http://maha-arogya.gov.in<br>Email:dhs_2005@rediffmail.com<br>Email:miscell@rediffmail.com |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | Fax No.022-22611034/22620234(DHS) |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६११४७१ | 022-22679044 (Hosp.) |
| सहसंचालक (प्राआर्के-जिल्हास्तर) | २२६२०२४९ | 022-22622155 (CAO) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२११८६ | 022-22703785 (Control Room) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | 022-22621047 (NCD) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६१६७५५ | 022-22625799 (Procurement Cell) |
| महत्वाचे व तातडीचे परीपत्रक<br>कालमर्यादा | | क्र. संआसे/ रुग्णालयीन व शीतसाखळी उपकरण निर्लेखन - जाहीर लिलाव कार्यवाही / परीपत्रक / टे-३/कक्ष-३/ दिनांक:- १४ जानेवारी २०१२ |

प्रति,

प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर.

प्राचार्य, आरोग्य कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, विभागीय मंडळ (सर्व).

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग ) विभागीय मंडळ, (सर्व).

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय) (सर्व).

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग ) (सर्व).

अधिक्षक, सामान्य रुग्णालय, औंध, पुणे.

जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व).

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).

जिल्हा क्षयरोग /हिवताप/हत्तीरोग अधिकारी (सर्व).

वरीष्ठ वैज्ञानिक अधिकारी, नागपूर

वैद्यकीय अधिक्षक, मानसिक आरोग्य संस्था, पुणे /ठाणे / नागपूर / रत्नागिरी.

वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय / ग्रामीण रुग्णालय / स्त्री रुग्णालय (सर्व).

तालुका वैद्यकीय अधिकारी (सर्व).

**विषय :-निरुपयोगी निर्लेखनपात्र रुग्णालयीन व शीतसाखळी उपकरणे अंतिम निर्लेखन करणे, अंतिम निर्लेखित रुग्णालयीन व शीतसाखळी उपकरणे जाहिर लिलावाव्दारे विक्री करणे इत्यादी बाबत करावयाची कार्यवाही.**

**संदर्भ :** १) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र.संकीर्ण २०११/प्र.क्र.२०४/ आरोग्य-४, दि.२७/१२/२०११.

२) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र संआसे/ रु.शि.सा.उप. निर्लेखन/ बैठक इतिवृत्त/क-३/२०११ दिनांक ५/१/२०१२..

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र.संकीर्ण २०११/प्र.क्र.२०४/ आरोग्य-४, दि.९/१/२०१२.

संदर्भिय पत्रांच्या प्रती सोबत जोडलेल्या आहेत, त्याचे अवलोकन करावे आणि त्यानुसार विषयांकित कार्यवाही पुढील निर्देशानुसार दिलेल्या मुदतीतच पुर्ण करावी. निरुपयोगी निर्लेखनपात्र रुग्णालयीन व शीतसाखळी उपकरणे अंतिम निर्लेखन करणे, अंतिम निर्लेखित रुग्णालयीन व शीतसाखळी उपकरणे जाहिर लिलावाव्दारे विक्री करणे इत्यादी बाबत आरोग्य सेवा संचालनालय मुंबई, यांनी यापुर्वी विविध परिपत्रक आणि पत्राव्दारे दिलेल्या सूचना या परिपत्रकाव्दारे रद्द करण्यात येत असून, या संदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबत स्वयंस्पष्ट सूचना पुढील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

अ) जड वस्तू संग्रहातील निरुपयोगी निर्लेखनपात्र रुग्णालयीन व शीतसाखळी उपकरणे अंतिम निर्लेखित करताना पुढील प्रमाणे बाबी विचारात घ्याव्यात :-

१) निर्लेखन करते वेळी उपकरणाचे आयुर्मान किमान दहा वर्षे असले पाहीजे.
२) जीव वैद्यकीय अभियंता, विभागीय आरोग्य साधन सामुग्री देखभाल व दुरुस्ती कार्यशाळा यांचा निर्लेखन करावयाच्या उपकरणाच्या सद्य:स्थिती बाबत तांत्रिक अभिप्राय असणे बंधन कारक राहील.
३) निर्लेखन समितीची मान्यता बंधन कारक राहील.

सदर समिती मध्ये पुढील सदस्यांचा समावेश असावा.

| | |
|---|---|
| संबंधित मंडळातील सहाय्यक संचालक ( वैद्यकीय) | - अध्यक्ष |
| संबंधित संस्थेचे संस्थाप्रमुख | - सदस्य सचिव |
| संबंधित मंडळ कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी | - सदस्य |
| संबंधित मंडळातील जीव वैद्यकीय अभियंता ( एचइएमआर) | - सदस्य |

ब) जड वस्तू संग्रहातील निरुपयोगी निर्लेखनपात्र रुग्णालयीन व शीतसाखळी उपकरणे अंतिम निर्लेखित आदेश काढणे :- शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि.१५ मे २००९ नुसार वित्तीय अधिकार नियम १९७८ भाग पहिला मधील उपविभाग १ अनुक्रमांक २३ नियम १४६ अन्वये जड वस्तु संग्रहातील निरुपयोगी वस्तु निर्लेखित करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख यांना दिलेले आहेत. त्यानुसार विषयांकित निरुपयोगी वस्तु निर्लेखित करण्याचे अधिकारान्वये आपल्या अधिपत्याखालील संस्थेतील जुन्या निरुपयोगी रुग्णालयीन/शितसाखळी उपकरणे निर्लेखित करण्याचे अधिकार आपणास आहेत, तरी त्याप्रमाणे उपकरणांचे अंतिम निर्लेखनाचे आदेश काढून कार्यवाही करावी.

तसेच संदर्भ क्र.१, २ व ३ नुसार विभाग प्रमुखाला प्रत्येक प्रकरणी (प्रत्येक प्रकरण म्हणजे एका उपकरणाची मुळ खरेदी किंमत) रु १,००,०००/- (रु. एक लाख फक्त) पर्यंतचे उपकरणे अंतिम निर्लेखित करण्याबाबतचे अधिकार दिलेले आहेत. प्रादेशिक कार्यालय प्रमुखाला प्रत्येक प्रकरणी रु. ६०,०००/- (रुपये साठ हजार फक्त) पर्यंतचे उपकरणे अंतिम निर्लेखित करण्याबाबतचे अधिकार दिलेले आहेत. कार्यालय प्रमुखाला प्रत्येक प्रकरणी रु.३०,०००/- (रुपये तीस हजार फक्त) पर्यंतचे उपकरणे अंतिम निर्लेखित करण्याबाबतचे अधिकार दिलेले आहेत. या अधिकारानुसार आपल्या आरोग्य संस्थेमधील रुग्णालयीन/शितसाखळी उपकरणे निर्लेखित करण्याची कार्यवाही करावी. यानुसार किती रुग्णालयीन/शितसाखळी उपकरणे निर्लेखित झाली याची माहिति संकलित करावी.

रु.६०,०००/- (रुपये साठ हजार फक्त) ते रु १,००,०००/- (रु. एक लाख फक्त) पर्यंतची प्रत्येक प्रकरणी निर्लेखनपात्र उपकरणांची यादी करावी. सदर यादी मंडळस्तरावरील जीव वैद्यकीय

अभियंता, विभागीय आरोग्य साधन सामुग्री देखभाल दुरुस्ती कार्यशाळा, सहाय्यक संचालक (वैद्यकीय), मुख्य प्रशासकीय अधिकारी व मंडळ उपसंचालक यांच्या समितीमार्फत छानणी करुन अंतिम यादी आरोग्य सेवा संचालनालय मुंबई यांना सादर करावी. याप्रकरणी संचालनालयाकडून अंतिम रुग्णालयीन / शितसाखळी निर्लेखना बाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील, किंवा मंडळ उपसंचालकाना वित्तिय शक्ती पुर्नःप्रदान केल्या जातील.

रु १,००,०००/- (रु. एक लाख फक्त) पेक्षा जास्त किंमत असलेल्या निर्लेखनपात्र रुग्णालयीन व शितसाखळी उपकरणांची (प्रत्येक प्रकरणी) अंतिम यादी तयार करण्यात यावी. सदर यादी मंडळ स्तरावरील जीव वैद्यकीय अभियंता, विभागीय आरोग्य साधन सामुग्री देखभाल दुरुस्ती कार्यशाळा, सहाय्यक संचालक (वैद्यकीय), मुख्य प्रशासकीय अधिकारी व मंडळ उपसंचालक यांच्या समितीमार्फत छानणी करुन अंतिम यादी आरोग्य सेवा संचालनालय मुंबई यांना सादर करावी. सदर यादीतील अंतिम निर्लेखनपात्र उपकरणांचा प्रस्ताव शासनास पाठवून, शासनाकडून अंतिम रुग्णालयीन/शितसाखळी निर्लेखना बाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

क) या अनुषंगाने आपले स्तरावरुन आपले कार्यालयातील आपले अंतर्गत आरोग्य संस्थांमधिल १० वर्षे किमान आयुष्य झालेल्या निरुपयोगी, निर्लेखनपात्र रुग्णालयीन व शितसाखळी उपकरणे यासंची यादी खालील प्रपत्रानुसार तयार करण्यात यावी.

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | आरोग्य संस्थेचे नाव | उपकरणांचे नाव | उपकरणांची संख्या | प्राप्त दिनांक | साठा पुस्तक क्र.व पान क्र. | खरेदी किंमत | घसारा किंमत | उपकरणाची सद्यःस्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

शेरा या कॉलम मध्ये निर्लेखन करण्यासाठीचे जीव वैद्यकीय अभियंता, विभागीय आरोग्य साधन सामुग्री देखभाल दुरुस्ती कार्यशाळा, यांचे स्वयंस्पष्टतांत्रिक अभिप्राय नमुद करण्यात यावेत.
उदा,
१) उपकरण कालबाहय झालेले आहे. २) उपकरणाच्या दुरुस्तीसाठी लागणारे सुटे भाग सहजरित्या उपलब्ध होत नाहीत. ३) उपकरण जूने असल्याने वारंवार नादुरुस्त होत आहे. ४) उपकरण दुरुस्ती साठी मोठया प्रमाणावर खर्च आहे.

महाराष्ट्र शासन, वित विभाग परिपत्रक क्रमांक : डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक.१८/६/१९९१. च्या परिपत्रकासोबत दिलेल्या सहपत्र - महाराष्ट्र पब्लिक वर्क्स मॅन्युअलच्या परिच्छेद-४१५ च्या उतारा नुसार निर्लेखन पात्र उपकरणंचा घसारा काढण्याचा दर पुढील प्रमाणे असून, त्यानुसार उपकरणाची घसारा किंमत संबंधित संस्था प्रमुखांच्या स्तरावर काढण्यात यावी.

The rates of the depreciation for various categories are as follows :-

1. Plants, and machinery :- 10%

When the annual valuation of the article reaches ten percent of original cost, no depreciation need be charged. In other words, the residual value of the article is to be fixed at10% of the Original cost beyond which depreciation not to be charged. The following example will illustrate, as to how to calculate depreciation on straight line method.

**Example**

The original cost of article is Rs.100, Residual value is Rs.10 (10% of original cost)
Rate of depreciation is 10%. It means estimated life is 10 years.

Depreciation : $\frac{\text{Cost of Article} - \text{Residual value}}{\text{Estimated life}}$

$= \frac{100-10}{10}$

$= 90/10 = 9$

Yearly depreciation would be Rs.9. Asset to be depreciated for 10 years (9x10) Thereafter residual value of Rs.10 is not be depreciated.
Thus the written down value of Rs.10 of the article needs to be written off.

**(ड) अंतिम निर्लेखित रुग्णालयीन व शितसाखळी उपकरणे याची हातची किंमत निश्चित करणे.**
महाराष्ट्र शासनए सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.खरेदी२००९/प्र.क्र.८७/आरोग्य-८, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक.१६ नोव्हेंबर २००९. या नुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत निर्लेखित करावयाची निकामी वाहने तसेच त्यांचे सुटे भाग आणि रुग्णालयीन उपकरणे यांची हातची किंमत ठरविण्यासाठी समिती गठित करण्यात आलेली आहे.

या समितीचे सहाय्यक संचालक (वैद्यकीय), उपसंचालक, विभागीय मंडळ, आरोग्य सेवा हे अध्यक्ष असुन, संबंधित जिल्हयातील जिल्हा शल्य चिकित्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी/वैद्यकीय अधिकारी/आरोग्य विभागातील वर्ग-१ चे अधिकारी सदस्य आहेत. आणि जीव वैद्यकीय अभियंता, आरोग्य साधन सामुग्री दुरुस्ती व देखभाल कार्यशाळा (एचईएमआर) येथील मंडळ स्तर हे सदस्य सचिव आहेत. या समितीमध्ये एकूण चार सदस्य आहेत.

१) महाराष्ट्र शासन, वित विभाग परिपत्रक क्रमांक : डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक.१८/६/१९९१ (प्रत संलग्न) नुसार मुद्दा क्र.३ मध्ये लिलावापूर्वी विक्रीच्या वस्तुंची हातची किंमत (अपसेट प्राईज) ठरविण्याचे सर्वसाधारण तत्व नमूद केलेले आहेत. यानूसार कार्यवाही करण्यात यावी.
२) समितीने वरील शासन निर्णयानुसार नमूद मार्गदर्शक तत्वे आणि उपकरणाची प्रत्यक्ष तपासणी करुन उपकरणाची वस्तूनिष्ठ हातची किंमत (अपसेट प्राईज) निश्चित करावी.
३) सदर हातची किंमत सिलबंद लिफाफा करुन समिती अध्यक्षांनी मंडळ उपसंचालक यांच्या मंजुरीसाठी सादर करावी. सोबत आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात यावीत. सदर कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

४) मंडळ उपसंचालक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन अंतिम निर्लेखित उपकरणाच्या हातच्या किंमतीस मंजूरी द्यावी.
५) सदर हातची किंमत पुन्हा सिलबंद लिफाफा करुन मंडळ उपसंचालक यांचे कडे सुरक्षित ठेवण्यास यावी.
६) मंडळ उपसंचालक हे लिलाव समिती सदस्य असून प्रत्यक्ष लिलावाच्या वेळी त्यांनी सदर सिलबंद लिफाफा लिलाव समिती समोर सादर करावा.
७) संस्थेतील सर्व अंतिम निर्लेखन पात्र उपकरणांचे व सर्व लॉटचे फोटो काढून कायम स्वरुपी संस्थेमध्ये जतन करुन ठेवावेत.
८) जिल्हया मधिल सर्व अंतिम निर्लेखित पात्र उपकरणांचे सर्व दृष्टिने सोईस्कर अशा ठिकाणी रुग्णालयीन उपकरणांचा एक लॉट आणि शितसाखळी उपकरणांचा एक लॉट असे लिलावाच्या सोईसाठी दोन लॉट करावेत. जर उपकरणांची संख्या जास्त असेल तर दोन पेक्षा जास्त लॉट करावेत. कोणत्याही परिस्थिती मध्ये संस्थानिहाय स्वतंत्रपणे संबंधित संस्थेत लॉट करु नयेत.
९) उपकरणांची हातची किंमत काढताना कोणत्या पद्धतीचा अवलंब केला गेला, कोणत्या बाबी विचारात घेतल्या, कोणत्या कागदपत्रांचा पुरावा म्हणून आधार घेतला गेला. या बाबतची सर्व कागद पत्रे समितीचे सदस्य सचिव, जीव वैद्यकीय अभियंता (एचइएमआर) यांनी त्यांचे कार्यालयात काळजीपूर्वक जतन करुन ठेवावी.

**ई) अंतिम निर्लेखित रुग्णालयीन व शितसाखळी उपकरणे इत्यादीची जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे:-** महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. खरेदी २००९/ प्र.क्र. ८७ / आरोग्य -८ मंत्रालय, मुंबई- ३२, अिनांक १६ नोव्हेंबर २००९ ( प्रत संलग्न) या नुसार सार्वजनिक आरोग्य विभागातील निर्लेखित करावयाची रुग्णालयीन उपकरणे तसेच त्यांचे सुटे भाग यांचे लिलावासाठी समिती गठित करण्यात आलेली आहे.

या समितीचे उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे हे अध्यक्ष आहेत. या समिती मध्ये एकूण सात सदस्य आहेत.

१) महाराष्ट्र शासन, वित विभाग परिपत्रक क्रमांक : डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक.१८/६/१९९१. (प्रत संलग्न) नुसार निरुपयोगी,दुरुस्ती न होण्याजोग्या अथवा गरजेपेक्ष अतिरिक्त असलेल्या शासकीय भांडार वस्तू, यंत्रसामुग्री, वाहने, इत्यादींची लिलावाने विक्री करण्याची व्यवस्था या अंतर्गत जाहिर लिलावाची पद्धती नमुद करण्यात आलेली आहे. या नुसार वरील प्रमाणे अंतिम निर्लेखित उपकरणांच्या जाहिर लिलावाची कार्यवाही करण्यात यावी.
२) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत विविध आरोग्य संस्था, टायर्स -टयुब, बॅटरी व रुग्णालयीन उपकरणे यांची-जाहिर लिलावाव्दारे विक्री करण्याची शासन निर्णय क्र. खरेदी २००९ / प्र.क्र. ८७/ आरोग्य -८ मंत्रालयें, मुंबई ३२, दिनांक १७ जून २०१० अन्वये मे. शंकर रामचंद्र ऑक्शिनर्स, पुणे यांची शासकीय लिलावदार म्हणून शासननिर्णयाच्या दिनांका पासून दोन वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांचे मार्फत वरील प्रमाणे निर्लेखित उपकरणांच्या जाहिर लिलावाची कार्यवाही करण्यात यावी.
३) मंडळांतर्गत करावयाच्या वरील प्रमाणे अंतिम निर्लेखित उपकरणांच्या जाहिर लिलावाची जारीख मंडळ उपसंचालक यांनी शासकीय लिलावदार यांचेशी संपर्क साधून निश्चित करावी. लिलाव समिती अध्यक्षांची मान्यता घेण्यात सावी. तसेच लिलावासाठी उपस्थित राहणेबाबत सर्व लिलाव समिती सदस्यांना अवगत करावे. लिलावा नंतरची पुढील कार्यवाही निर्लेखित वाहनांच्या लिलावा

नंतरच्या कार्यवाही सारखीच आहे. त्या बाबत उपसंचालक (परिवहन) कार्यालया कडून सर्व मार्गदर्शन करण्यात आलेले आहेच.तरी सुध्दा काही अडचण असल्यास उपसंचालक (परिवहन) कार्यालयाशी संपर्क साधावा.

**या प्रमाणे उपकरणे निर्लेखना बाबतची कार्यवाही दिनांक ३१ जानेवारी २०१२ पर्यंत पुर्ण होण्याबाबत नियोजन करण्यात यावे, आणि पुढे त्याच्या लिलावाची कार्यवाही ३१ मार्च २०१२ पर्यंत निश्चित पणे पुर्ण करण्यात यावी.**

सोबत : वरीलप्रमाणे

संचालक, आरोग्य सेवा,
मुंबई.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(कुटुंब कल्याण) पुणे.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(सामाजिक बांधिलकी) मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(मानसिक आरोग्य) मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(एडस्) मुंबई.
सह संचालक, आरोग्य सेवा(हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे.
सह संचालक, आरोग्य सेवा(कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा (प्रभारी मंडळ) सर्व.

२/- आपले स्तरावरुन संबंधित संस्थाप्रमुखांना वरीलप्रमाणे कार्यवाही ३१ जानेवारी २०१२ पर्यंत पूर्ण करण्याबाबत उचित निर्देश देण्यात यावेत तसेच वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.सदर कार्यवाही विहीत कालावधीत पुर्ण करुन घेण्यात यावी.

प्रत माहिती साठी
उपसंचालक, आरोग्य सेवा(आय ई सी ब्युरो) पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा(आमाजिआ) पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा(रा आ प्र शा) सर्व.
उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन) पुणे.

प्रत कार्यवाहीसाठी
जीव वैद्यकीय अभियंता, विभागीय आरोग्य साधन सामुग्री देखभाल व दुरुस्ती कार्यशाळा, सर्व

२/- परिपत्रकामध्ये नमूद कार्यवाही लवकरात लवकर करण्यासाठी मंडळातील आरोग्य संस्थाप्रमुखांना उपकरणांच्या तांत्रिक अहवाबाबत आवश्यक सहकार्य करण्यात यावे.

GH, SDH, RH - जडवस्तु [illegible]

आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय, आवार, पी.डिमेलो रोड,मुंबई-४०० ००१.

| | दूरध्वनी | |
|---|---|---|
| कार्यालय | २२६२१०३१-३६ | Website :http://maha-arogya.gov.in<br>Email:dhs_2005@rediffmail.com |
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००९ | Email:miscell@rediffmail.com<br>Fax No.022-22611034/22620234(DHS), |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६११४७१ | 022-22679044 (Hosp.) |
| सहसंचालक (प्राआकें-जिल्हास्तर) | २२६२०२४९ | 022-22622155 (CAO) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२११८६ | 022-22703785 (Control Room) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | 022-22621047 (NCD) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६१६७५५ | 022-22625799 (Procurement Cell) |
| महत्वाचे व तातडीचे परीपत्रक | | क्र.संआसे/जडसंग्रह वस्तु.निर्लेखन/परिपत्रक/क-३/२०१४.<br>दिनांक:-११/०८/२०१४ |

प्रति,

प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर.

प्राचार्य, आरोग्य कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, विभागीय मंडळ (सर्व).

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग) विभागीय मंडळ. (सर्व).

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय) (सर्व).

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) (सर्व)

अधिक्षक, सामान्य रुग्णालय, औंध, पुणे.

जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व).

जिल्हा क्षयरोग /हिवताप/हत्तीरोग अधिकारी (सर्व).

वरीष्ठ वैज्ञानिक अधिकारी, नागपूर

वैद्यकीय अधिक्षक, मानसिक आरोग्य संस्था, पुणे /ठाणे / नागपूर / रत्नागिरी

वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय / ग्रामीण रुग्णालय / स्त्री रुग्णालय (सर्व).

विषय :-जडवस्तु संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखित करुन, जाहिर लिलावाव्दारे विक्री करणे इत्यादी बाबत करावयाची कार्यवाही......

संदर्भ :-१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक:-डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक १८/६/१९९१.

२) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि. १५ मे २००९.

३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.[illegible] १००७/प्र.क्र.६१/ / आरोग्य -८/ मंत्रालय, मुंबई -३२, दि. ४ डिसेंबर,२००७.

४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. [illegible]/[illegible]/प्र.क्र.८७/आरोग्य-८ मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक १६ नोव्हेंबर, २०००

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्यातील सर्व स्तरावरील कार्यालये /रुग्णालये (ग्रामीण रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये क्षयरोग रुग्णालये, प्रादेशिक मनोरुग्णालये, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा इ.) या मध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणामध्ये निर्लेखनपात्र, दुरुस्त न होण्या सारख्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू विनावापर

पडून आहेत. यामुळे कार्यालयातील /रुग्णालयातील बऱ्याच मोठया प्रमाणात जागा व्यापली आहे. तसेच यामुळे अनेक समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी या वस्तूंची लवकरात लवकर विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने आपले अंतर्गत कार्यालयातील व सर्व आरोग्य संस्थांमधिल निरुपयोगी, निर्लेखनपात्र, दुरुस्त न होण्यासारख्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखित करणे, अंतिम निर्लेखित जडसंग्रह वस्तू जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे इत्यादी बाबत पुढील प्रमाणे कार्यवाही आपले स्तरावरुन तातडीने करण्यात यावी.

**(अ) विनावापर, निर्लेखनपात्र आणि दुरुस्त न होण्यासारख्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू यांची यादी तयार करणे** :-सर्व आरोग्य संस्था प्रमुखांनी आपल्या आरोग्य संस्थेतील जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची यादीमहाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक दिनांक २८ फेब्रुवारी १९६२ व दिनांक १८-६-१९९१ अन्वयेप्रशासकीय अधिकारी , कार्यालयीन अधिक्षक, सहाय्यक अधिक्षक आणि संबंधित भांडार नोंदवही हाताळणारा लिपिक यांच्या सहाय्यानेपुढील प्रपत्रा मध्ये तयार करावी.

यादया तयार करण्या बाबतची कार्यवाही आरोग्य संस्था प्रमुखांनी १५ सप्टेंबर, २०१४ पर्यंत पुर्ण करावी.

**प्रपत्र**

| अ.क्र. | आरोग्य संस्थेचे नाव | निर्लेखन पात्र जडसंग्रह वस्तूचे नाव | संख्या | प्राप्त दिनांक | साठा पुस्तक क्रमांक व पान क्रमांक | खरेदी किंमत | घसारा किमंत | जडवस्तु उपकरणाची सध:स्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

**(आ-१) निर्लेखन पात्र जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखन करण्यासाठीचे अभिप्राय**:-जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखन करण्यासाठीचे अभिप्राय शेरा या कॉलम मध्ये नमुद करण्यात यावेत. उदा:- १) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू तुटलेल्या आहेत. २) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूजुन्या असल्याने वारंवार दुरुस्ती करावी लागते. ३) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूंची दुरुस्ती सहजरित्या होऊ शकत नाही. ४)जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूच्या दुरुस्तीसाठी खरेदी किंमतीच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त खर्च अपेक्षित आहे.

**(आ-२) निर्लेखन पात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचा घसारा किंमत काढणेची पद्धत**:-महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक : डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक.१८/६/१९९१. च्या परिपत्रकासोबत दिलेल्या सहपत्र - महाराष्ट्र पब्लिक वर्क्स मॅन्युअलच्या परिच्छेद- ४१५ च्या नुसार निर्लेखन पात्र **जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचा** घसारा काढण्याचा दर निश्चित करावा आणि पुढील पद्धती नुसार उपकरणाची घसारा किंमत संबंधित संस्था प्रमुखांच्या स्तरावर काढण्यात यावी.

**Example**

- The rates of the depreciation for various categories are as follows :-

1. Plants and machinery :- 10%

When the annual valuation of the article reaches ten percent of original cost, no depreciation need be charged. In other words, the residual value of the article is to be fixed at 10% of the Original cost beyond which depreciation not to be charged. The following example will illustrate, as to how to calculate depreciation on straight line method.
The original cost of article is Rs.100. Residual value is Rs.10 (10% of original cost) Rate of depreciation is 10%. It means estimated life is 10 years.

**Depreciation :- Cost of Article – Residual value**

$$\text{Depreciation} = \frac{\text{Cost of Article} - \text{Residual value}}{\text{Estimated life}}$$

$$= \frac{100-10}{10} = \frac{90}{10} = 9 \text{ ( One year). } = (9\times10 = 90) \text{ ( Dep. } = 100-90 = 10)$$

**Yearly depreciation would be Rs.9. Asset to be depreciated for 10 years (9x10) Thereafter residual value of Rs.10 is not be depreciated. Thus the written down value of Rs.10 of the article needs to be written off.**

**(इ)१) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखना साठी मंडळस्तरीय निर्लेखन समितीची मान्यता बंधन कारक राहील. मंडळ उपसंचालक स्तरावरील समिती मध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे. प्रशासकीय सोयीसाठी सहाय्यक संचालक (वैद्यकीय) / मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना नोडल ऑफिसर म्हणून नेमण्यात येत आहे**

| | | |
|---|---|---|
| संबंधित मंडळातील सहाय्यक संचालक (वैद्यकीय) | - | अध्यक्ष |
| संबंधित मंडळ कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य |
| संबंधित मंडळातील जीव वैद्यकीय अभियंता (एचईएमआर) | - | सदस्य सचिव |

२) आरोग्य संस्था प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली उपकरणे निर्लेखना बाबत छानणी समिती गठित करण्यातयावी.

३) छानणी समिती मध्ये संबंधित आरोग्य संस्थेतील खालील नमुद केल्या प्रमाणे सदस्यांचा समावेशअसावा.

सामान्य रुग्णालय :-छानणी समिती सदस्य,

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हा शल्य चिकित्सक | - | अध्यक्ष |
| २) अतिरिक्तजिल्हा शल्य चिकित्सक / निवासी वैद्यकीय अधिकारी( बाह्य संपर्क) | - | सदस्य |
| ३) वैद्यकीय अधिकारी | - | सदस्य |
| ४) मुख्य प्रशासकीय अधिकारी / प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य |
| ५) अधिसेविका | - | सदस्य |
| ६) भांडार पाल | - | सदस्यसचिव |

उप जिल्हा रुग्णालय /ग्रामीण रुग्णालय :-छानणी समिती सदस्य,

| | | |
|---|---|---|
| १) वैद्यकीय अधिक्षक | - | अध्यक्ष |
| २) वैद्यकीय अधिकारी | - | सदस्य |
| ३) औषध निर्माण अधिकारी | - | सदस्य |
| ४) सहाय्यकअधिसेविका / परिसेविका / इन्चार्ज अधिपरिचारिका | - | सदस्य |
| ५) सहाय्यक अधिक्षक / भांडार पाल / वरिष्ठ लिपिक | - | सदस्य सचिव |

इतर आरोग्य संस्था, कार्यालये :-छानणी समिती सदस्य,

| | | |
|---|---|---|
| १) कार्यालय / संस्था प्रमुख | - | अध्यक्ष |
| २) ड्रिलिंग अधिकारी | - | सदस्य |
| ३) मुख्य प्रशासकीय अधिकारी / प्रशासकीय अधिकारी / अधिक्षक / महा.अधिक्षक | - | सदस्य |
| ४) भांडार लिपिक | - | सदस्यसचिव |

(ई) ग्रामीण रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, क्षय रुग्णालये, यांनी त्यांच्या कडील छानणी समितीने जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखनासाठी प्रस्तावित करुन संवंधित जिल्हा शल्य चिकित्सक यांचे मार्फत अंतिम निर्लेखनासाठी मंडळ स्तरावरील गठित समिती कडे निर्लेखनासाठी प्रस्तावित करावीत. रुग्णालये वगळून जिल्हया मधिल इतर सर्व कार्यालयांनी त्यांचे कार्यालयातील छानणी समितीने जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखनासाठी प्रस्तावित करुन थेट मंडळ स्तरावरील गठित समिती कडे निर्लेखनासाठी प्रस्तावित करावीत. मंडळस्तरावरील गठित निर्लेखन समितीने मंजूरी दिल्यानंतर जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश निर्गमित करावेत.

(प्रशासकीय सोयीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडील निवासी वैद्यकीय अधिकारी ( बाह्य संपर्क ) आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी / प्रशासकीय अधिकारी यांना नोडल ऑफिसर म्हणून नेमण्यात येत आहे)

मंडळ उपसंचालक स्तरावरील समिती मध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| सबंधित मंडळातील सहाय्यक संचालक (वैद्यकीय) | - | अध्यक्ष |
| सबंधित मंडळ कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य |
| संबंधित मंडळातील जीव वैद्यकीय अभियंता (एचईएमआर) | - | सदस्य सचिव |

मंडळ स्तरावर प्रशासकीय सोयीसाठी सहाय्यक संचालक (वैद्यकीय) / मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना नोडल ऑफिसर म्हणून नेमण्यात येत आहे

प्रस्तावास संवंधित मंडळ उपसंचालकांच्या मंजूरी बाबतची कार्यवाही आरोग्य संस्था प्रमुखांनी १५ ऑक्टोबर, २०१४ पर्यंत पुर्ण करावी.

उ) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू चे निर्लेखन आदेश काढणे :-

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला उप विभाग क्रमांक १ ते ५, शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वि.अ.प्र.-१०.०९/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दिनांक १५ मे २००९.मधील भाग पहिला उप विभाग १ मधील अ.क्र. ७३, नियम क्रमांक १४६ अन्वये जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखित करण्याचे अधिकार प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना प्रदान करण्यात आलेले आहेत/विभाग प्रमुखांना/प्रादेशिक कार्यालय [ प्रत्येक प्रकरणे म्हणजे एका उपकरणाची मुळ खरेदी किंमत) रु. १,००,०००/- पर्यंत/ (उपकरणे निर्लेखित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. प्रादेशिक

कार्यालय प्रमुख यांना प्रत्येक प्रकरणी रु. ६०,०००/- पर्यंत उपकरणे निर्लेखित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत आणि कार्यालय प्रमुखाला रु. ३०,०००/- पर्यंत उपकरणे निर्लेखित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. या अधिकारानुसार आपल्या आरोग्य संस्थेमधिल निर्लेखन पात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचेनिर्लेखन आदेश काढून निर्लेखनाची कार्यवाही पुर्ण करावी.

१) रु. ३०,०००/- पर्यंत किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश कार्यालय प्रमुखांनी काढावेत

२) रु. ६०,०००/- पर्यंत किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश काढण्याचे अधिकार प्रादेशिक कार्यालय प्रमुख याना आहेत त्यामुळे कार्यालय प्रमुखांनी रु.३०,०००/- ते ६०,०००/- पर्यंतच्या प्रत्येक प्रकरणी मूळ खरेदी किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे सविस्तर प्रस्ताव मंडळ उपसंचालक यांना पाठवून अंतिम निर्लेखन आदेश प्राप्त करुन घ्यावेत

३) रु.६०,०००/- ते रु. १,००,०००/- पर्यंत किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश काढण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांना आहेत. त्यामुळे कार्यालय प्रमुखांनी रु.६०,०००/- ते १,००,०००/- पर्यंतच्या प्रत्येक प्रकरणी मुळ खरेदी किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे सविस्तर प्रस्ताव मंडळ उपसंचालक यांचे मार्फत मा.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना पाठवून अंतिम निर्लेखन आदेशप्राप्त करुन घ्यावेत. व सदर प्रस्तावा मधिल निर्लेखित जडवस्त संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे विक्री बाबत मा. संचालक यांची मंजुरी घ्यावी.

४) कार्यालय प्रमुखांनी रु.१,००,०००/- पेक्षा जास्त किंमत असलेल्या निर्लेखनपात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूंची ( प्रत्येक प्रकरणी) अंतिम यादी तयार करावी. सदर यादी मंडळ उपसंचालक स्तरावरील गठित निर्लेखन समिती मार्फत छाननी करुन अंतिम यादी मंडळ उपसंचालक यांचे मार्फत आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना सादर करावी. सदर यादीतील अंतिम निर्लेखनपात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे प्रस्ताव शासनास पाठवून, शासनाकडून अंतिम जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

## (ऊ)अंतिम निर्लेखित जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची हातची (अपसेट प्राईस) किंमत निश्चित करणे :-

१) अंतिम निर्लेखित जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूंची हातची किंमत काढण्यासाठी संस्था प्रमुखाच्या अध्यक्षते खाली कार्यालयातील राजपत्रित अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात यावी.या समिती मध्ये प्रशासन / लेखाविषयक कार्यभार सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांचा समावेश असावा. समिती मध्ये किमान तीन सदस्यांचा समावेश असावा

२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक:-डीएफपी १०९१/प्र.८/विनियम, मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक १६/६/१९९१.मधिल मुद्दा क्र. ३ मधिल अ, ब, किंवा क नुसार काळजीपुर्वक हातची किंमत निश्चित करावी.यानुसार समितीने निर्लेखित जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची हातची किंमत काढण्याची कार्यवाही करावी.

३) सदर हातची किंमत सिलबंद लिफाफा करुन संबंधित संस्था प्रमुखांनी मंडळ उपसंचालक यांच्या मंजूरीसाठी सादर करावी.सोबत आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

४) मंडळ उपसंचालक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन अंतिम निर्लेखित जडसंग्रहातील वस्तूंच्या हातच्या किंमतीस मंजूरी द्यावी.

५) संस्था प्रमुखांनी सदर हातची किंमत पुन्हा सिलबंद लिफाफा करुन मंडळ उपसंचालक यांचे कडे सुरक्षित ठेवण्यात यावी.

**जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची हातची (अपसेट प्राईस) किंमत काढणे व संबंधित मंडळ स्तरावरील समितीने मंजूरी बाबतची कार्यवाही १५ नोव्हेंबर, २०१४ पर्यंत पुर्ण करावी.**

(ए) आरोग्य संस्था प्रमुखाने अंतिम निर्लेखित जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूचीविक्री करणेपुर्वी पुढील प्रमाणे प्रमाण पत्र लिलाव समिती अध्याक्षांकडे सादर करावयाचे आहे. तसेच एक प्रत प्रस्तावा बरोबर ठेवणेची आहे:-

"प्रमाणित करण्यात येते की, ——— मंडळातील , ——— जिल्हयामधिल ———————या आरोग्य संस्थे मधिल एकूण — नग अंतिम निर्लेखित जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूआहेत. या पैकी — नग विक्रीसाठी प्रस्तावित आहेत. या सर्व जडसंग्रह वस्तूबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देत आहे."

१) या सर्व जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूचेसर्व अँगलनी फोटो काढलेले आहेत.

२) या सर्व जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूवर कोणत्याही स्वरुपाचा , कोणत्याही पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल नाही.

३) या सर्व जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूवर कोणत्याही न्यायालयात कमत्याही स्वरुपाचे प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

४) या सर्व जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूवर संबंधित कंपनीच्या उत्पादकाचा /त्याचा अधिकृत विक्रेता यांचाकोणत्याही स्वरुपाचा (उपकरणाचा निकृष्ठ दर्जा, सदोष पुरवठा इत्यादी- इत्यादीबाबत )दावा संस्था प्रमुखांकडे प्रलंबित अथवा न्यायप्रविष्ठ नाही.

५) सर्व जडसंग्रह वस्तूसंबंधी कोणीही माहितीच्या अधिकारात माहीती मागीतलेली नाही.

(ऐ) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू विक्री बाबत महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांकः-डीएफपी १०९१/प्र.४/विनियम. मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक १८/६/१९९१.मधिल मुद्दा क्र.५ मधिल (एक) व (दोन) नुसार कार्यवाही करावी.

(एक) संबंधित प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील एका जिल्हयातील विविध स्थानिक कार्यालयाच्या एका आर्थिक वर्षात विक्री करावयाच्या सर्व वस्तूंची एकूण हातची किंमत रु.५०००/- पेक्षा जास्त नसेल तेव्हा त्या विभागाच्या जिल्हा पातळीवरील कार्यालय प्रमुखाने अशा सर्व कार्यालयाच्या वस्तूंचा लिलाव स्थानिक पातळीवर करावा. लिलावाच्या प्रसिध्दीची व्याप्ती , हातची किंमत , इत्यादी बाबतवित्त विभागाच्या दिनांक १८/६/१९९१ च्या परिपत्रकातील परिच्छेद २ व ३ मध्ये नमुद केलेल्या तत्वानुसार निर्णय घेण्यास जिल्हा पातळीवरील कार्यालय प्रमुख अशा प्रकरणा मध्ये सक्षम असतील.

(दोन) कोठल्याही एका प्रशासकीय विभागाच्या एका जिल्ह्यातील विविध स्थानिक कार्यालयांच्या एका आर्थिक वर्षात विक्री करावयाच्या सर्व वस्तूंची एकूण हातची किंमत रु. ५०००/- पेक्षा जास्त असेल तेव्हा लिलावाच्या प्रसिध्दीची व्याप्ती , हातची किंमत, लिलावाचे स्थळ व दिनांक इत्यादी बाबत निर्णय घेण्या करीता एक समिती नियुक्त करण्यात यावी. संबंधित विभागाच्या नियंत्रणा खालील जेष्ठतम प्रोदेशिक विभाग प्रमुख हे अशा समितीचे अध्यक्ष असावे. व संबंधित विभागाने निवडलेले अन्य दोन अधिकारी समितीचे सदस्य असावेत. समितीने घेतलेल्या निर्णयानुसार लिलाव पार पाडण्याची व्यवस्था जेष्ठतम विभाग प्रमुखाने करावी.

आरोग्य विभागात राज्यस्तरावरील आरोग्य संस्थांची संख्या जास्त आहे. त्यामुळे सर्व वस्तूंची हातची किंमत रु ५०००/- पेक्षा जास्त राहणार आहे. ही बाब विचारात घेऊन जेष्ठतम प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणजेच विभागीय उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येत आहे. त्यात पुढील सदस्यांचा समावेश राहील.

| | | |
|---|---|---|
| १) उपसंचालक विभागीय मंडळ | - | अध्यक्ष |
| २) सहाय्यक संचालक (वैद्यकीय) | - | सदस्य |
| ३) मुख्य प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य |
| ४) संबंधित जिल्ह्याचे जिल्हा शल्य चिकित्सक | - | सदस्य |
| ५) जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील मुख्य /प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य सचिव |

ओ) प्रत्यक्ष लिलावानंतर खरेदीदाराने साहित्याची उचल केल्यानंतर साठासंग्रह नोंदवहीत तशी नोंद घेऊन साहित्य कमी करण्यात यावे.

सोबत : वरीलप्रमाणे

संचालक,
आरोग्य सेवा, मुंबई.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(कुटुंब कल्याण) पुणे.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(सामाजिक बांधिलकी) मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(मानसिक आरोग्य) मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(एडस्) मुंबई.
सह संचालक, आरोग्य सेवा(हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे.
सह संचालक, आरोग्य सेवा(कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा(प्रभारी मंडळ) सर्व.

२/- आपले स्तरावरुन संबंधित संस्थाप्रमुखांना वरीलप्रमाणे कार्यवाही मे २०११ अखेर पूर्ण करण्याबाबत उचित निर्णय देण्यात यावेत तसेच वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
उपसंचालक, आरोग्य सेवा(आय ई सी ब्युरो) पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा(आमाजिआ) पुणे.

उपसंचालक, आरोग्य सेवा(रा आ प्र शा) सर्व.
उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन) पुणे.
प्रत कार्यवाहीसाठी
जीव वैद्यकीय अभियंता, विभागीय आरोग्य साधन सामुग्री देखभाल व दुरुस्ती कार्यशाळा, सर्व

२/- परिपत्रकामध्ये नमूद कार्यवाही लवकरात लवकर करण्यासाठी मंडळातील आरोग्य संस्थाप्रमुखांना आवश्यक सहकार्य करण्यात यावे.

Misc/ HEMK


आरोग्य सेवा संचालनालय
(महाराष्ट्र राज्य)
आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय, आवार, पी.डिमेलो रोड,मुंबई-४०० ००१.


| | दूरध्वनी | |
|---|---|---|
| कार्यालय | २२६२१०३१-३६ | Website :http://maha-arogya.gov.in<br>Email:dhs_2005@rediffmail.com<br>Email:miscell@rediffmail.com |
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | Fax No.022-22611034/22620234(DHS) |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६११४७१ | 022-22679044 (Hosp.) |
| सहसंचालक (प्राआके-जिल्हास्तर) | २२६२०२४९ | 022-22622155 (CAO) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२११८६ | 022-22703785 (Control Room) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | 022-22621047 (NCD) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६१६७५५ | 022-22625799 (Procurement Cell) |
| महत्वाचे व तातडीचे परीपत्रक | | क्र.संआसे/जडसंग्रह वस्तु.निर्लेखन/परिपत्रक/क-३/२०१४.<br>दिनांक:-११/०८/२०१४ |

प्रति,
प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर.
प्राचार्य, आरोग्य कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, विभागीय मंडळ (सर्व.)
सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग) विभागीय मंडळ (सर्व)
सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय) (सर्व)
सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) (सर्व)
अधिक्षक, सामान्य रुग्णालय, औंध, पुणे
जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)
जिल्हा क्षयरोग /हिवताप/हत्तीरोग अधिकारी (सर्व)
वरीष्ठ वैज्ञानिक अधिकारी, नागपूर
वैद्यकीय अधिक्षक, मानसिक आरोग्य संस्था, पुणे /ठाणे / नागपूर / रत्नागिरी
वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय / ग्रामीण रुग्णालय / स्त्री रुग्णालय (सर्व).

**विषय :-जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखित करुन, जाहिर लिलावाव्दारे विक्री करणे इत्यादी बाबत करावयाची कार्यवाही**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक:-डीएफपी १०९१/प्र.क्र.४/विनियम, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक १८/६/१९९१.
२) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२००८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि. १५ मे २००९.
३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.खरेदी १००७/प्र.क्र.६१/आरोग्य-८/ मंत्रालय, मुंबई -३२ दि. ८ डिसेंबर, २००७.
४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. खरेदी/२००९/प्र.क्र.८७/आरोग्य-८ मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १६ नोव्हेंबर, २००९.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्यातील सर्व स्तरावरील कार्यालये /रुग्णालये (ग्रामीण रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, क्षयरोग रुग्णालये, प्रादेशिक मनोरुग्णालये, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा इ.) या मध्ये त्र्याच मोठ्या प्रमाणामध्ये निर्लेखनास पुरस्त न होण्या सारख्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू विनावापर



| उपसंचालक आरोग्य सेवा (परिवहन) पुणे-१ यांचे कार्यालय | |
|---|---|
| उपसंचालक | |
| सहाय्यक | |
| प्रशासकीय अधिकारी | |
| अधिक्षक | |
| कक्ष | |
| दिनांक | 19 AUG 2014 |
| आवक क्र. | |

पडून आहेत. यामुळे कार्यालयातील / रुग्णालयातील बऱ्याच मोठ्या प्रमाणात जागा व्यापली आहे. तसेच यामुळे अनेक समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी या वस्तूची लवकरात लवकर विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने आपले अंतर्गत कार्यालयातील व सर्व आरोग्य संस्थामधिल निरुपयोगी, निर्लेखनपात्र, दुरुस्त न होण्यासारख्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखित करणे, अंतिम निर्लेखित जडसंग्रह वस्तू जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे इत्यादी बाबत पुढील प्रमाणे कार्यवाही आपले स्तरावरुन तातडीने करण्यात यावी.

(अ) विनावापर, निर्लेखनपात्र आणि दुरुस्त न होण्यासारख्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू यांची यादी तयार करणे :- सर्व आरोग्य संस्था प्रमुखांनी आपल्या आरोग्य संस्थेतील जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची यादी महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक दिनांक २८ फेब्रुवारी १९६२ व दिनांक १८-६-१९९१ अन्वये प्रशासकीय अधिकारी कार्यालयीन अधिक्षक, सहाय्यक अधिक्षक आणि संबंधित भांडार नोंदवही हाताळणारा लिपिक यांच्या सहाय्याने पुढील प्रपत्रा मध्ये तयार करावी.

यादया तयार करण्या बाबतची कार्यवाही आरोग्य संस्था प्रमुखांनी १५ सप्टेंबर, २०१४ पर्यंत पुर्ण करावी.

प्रपत्र

| अ. क्र. | आरोग्य संस्थेचे नाव | निर्लेखन पात्र जडसंग्रह वस्तूचे नाव | संख्या | प्राप्त दिनांक | साठा पुस्तक क्रमांक व पान क्रमांक | खरेदी किमत | घसारा किमत | जडवस्तु उपकरणाची सद्यस्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

(आ-१) निर्लेखन पात्र जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखन करण्यासाठीचे अभिप्राय :- जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखन करण्यासाठीचे अभिप्राय शेरा या कालम मध्ये नमुद करण्यात यावेत. उदा. - १) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू तुटलेल्या आहेत. २) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू जुन्या असल्याने वारंवार दुरुस्ती करावी लागते. ३) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची दुरुस्ती सहजरित्या होऊ शकत नाही. ४) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूच्या दुरुस्तीसाठी खरेदी किंमतीच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त खर्च अपेक्षित आहे.

(आ-२) निर्लेखन पात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचा घसारा किंमत काढणेची पद्धत :- महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक डीएफपी १०९१/प्र ४/विनियम, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १८/६/१९९१ च्या परिपत्रकासोबत दिलेल्या सहपत्र - महाराष्ट्र पब्लिक वर्क्स मॅन्युअलच्या परिच्छेद ४१५ च्या नुसार निर्लेखन पात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचा घसारा काढण्याचा दर निश्चित करावा आणि पुढील पद्धती नुसार उपकरणाची घसारा किंमत संबधित संस्था प्रमुखांच्या स्तरावर काढण्यात यावी.

**Example**

- The rates of the depreciation for various categories are as follows :-

1. Plants and machinery :- 10%

When the annual valuation of the article reaches ten percent of original cost, no depreciation need be charged. In other words, the residual value of the article is to be fixed at 10% of the Original cost beyond which depreciation not to be charged. The following example will illustrate, as to how to calculate depreciation on straight line method.

The original cost of article is Rs.100. Residual value is Rs.10 (10% of original cost) Rate of depreciation is 10%. It means estimated life is 10 years.

$$\text{Depreciation} = \frac{\text{Cost of Article} - \text{Residual value}}{\text{Estimated life}}$$

$$= \frac{100-10}{10} = \frac{90}{10} = 9 \text{ (One year)}, = (9 \times 10 = 90), (\text{Dep.} = 100-90 = 10)$$

Yearly depreciation would be Rs.9. Asset to be depreciated for 10 years (9x10) Thereafter residual value of Rs.10 is not be depreciated. Thus the written down value of Rs.10 of the article needs to be written off.

(इ) १) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखना साठी मंडळस्तरीय निर्लेखन समितीची मान्यता बंधन कारक राहील. मंडळ उपसंचालक स्तरावरील समिती मध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे. प्रशासकीय सोयीसाठी सहाय्यक संचालक (वैद्यकीय) / मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना नोडल ऑफिसर म्हणून नेमण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| संबंधित मंडळातील सहाय्यक संचालक (वैद्यकीय) | अध्यक्ष |
| संबंधित मंडळ कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी | सदस्य |
| संबंधित मंडळातील जीव वैद्यकीय अभियंता (एचईएमआर) | सदस्य सचिव |

२) आरोग्य संस्था प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली उपकरणे निर्लेखना बाबत छानणी समिती गठित करण्यातयावी.

३) छानणी समिती मध्ये संबंधित आरोग्य संस्थेतील खालील नमुद केल्या प्रमाणे सदस्यांचा समावेशअसावा.

सामान्य रुग्णालय :- छानणी समिती सदस्य

| | |
|---|---|
| १) जिल्हा शल्य चिकित्सक | अध्यक्ष |
| २) अतिरिक्तजिल्हा शल्य चिकित्सक / निवासी वैद्यकीय अधिकारी( बाह्य संपर्क) | सदस्य |
| ३) वैद्यकीय अधिकारी | सदस्य |
| ४) मुख्य प्रशासकीय अधिकारी / प्रशासकीय अधिकारी | सदस्य |
| ५) अधिसेविका | सदस्य |
| ६) भांडार पाल | सदस्यसचिव |

उप जिल्हा रुग्णालय /ग्रामीण रुग्णालय :- छानणी समिती सदस्य

| | |
|---|---|
| १) वैद्यकीय अधिक्षक | अध्यक्ष |
| २) वैद्यकीय अधिकारी | सदस्य |
| ३) औषध निर्माण अधिकारी | सदस्य |
| ४) सहाय्यकअधिसेविका / परिसेविका / इन्चार्ज अधिपरिचारिका | सदस्य |
| ५) सहाय्यक अधिक्षक / भांडार पाल / वरिष्ठ लिपिक | सदस्य सचिव |

इतर आरोग्य संस्था, कार्यालये :- छाननी समिती सदस्य

१) कार्यालय / संस्था प्रमुख — अध्यक्ष
२) व्दितीय अधिकारी — सदस्य
३) मुख्य प्रशासकीय अधिकारी / प्रशासकीय अधिकारी / अधिक्षक / सहा.अधिक्षक — सदस्य
४) भांडार लिपिक — सदस्यसचिव

(ई) ग्रामीण रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, क्षय रुग्णालये, यांनी त्यांच्या कडील छाननी समितीने जडवस्तु संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखनासाठी प्रस्तावित करुन संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक यांचे मार्फत अंतिम निर्लेखनासाठी मंडळ स्तरावरील गठित समिती कडे निर्लेखनासाठी प्रस्तावित करावीत. रुग्णालये वगळून जिल्हया मधिल इतर सर्व कार्यालयानी त्यांचे कार्यालयातील छाननी समितीने जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू अंतिम निर्लेखनासाठी प्रस्तावित करुन थेट मंडळ स्तरावरील गठित समिती कडे निर्लेखनासाठी प्रस्तावित करावीत. मंडळस्तरावरील गठित निर्लेखन समितीने मंजूरी दिल्यानंतर जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश निर्गमित करावेत.

(प्रशासकीय सोयीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडील निवासी वैद्यकीय अधिकारी ( बाहय संपर्क ) आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी / प्रशासकीय अधिकारी यांना नोडल ऑफिसर म्हणून नेमण्यात येत आहे)

मंडळ उपसंचालक स्तरावरील समिती मध्ये पुढील सदस्यांचा समावेश आहे.

संबधित मंडळातील सहाय्यक संचालक (वैद्यकीय) — अध्यक्ष
संबधित मंडळ कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी — सदस्य
संबधित मंडळातील जीव वैद्यकीय आभियंता (एचइएमआर) — सदस्य सचिव

मंडळ स्तरावर प्रशासकीय सोयीसाठी सहाय्यक संचालक (वैद्यकीय) / मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना नोडल ऑफिसर म्हणून नेमण्यात येत आहे.

प्रस्तावास संबधित मंडळ उपसंचालकांच्या मंजूरी बाबतची कार्यवाही आरोग्य संस्था प्रमुखांनी १५ ऑक्टोबर, २०१४ पर्यंत पुर्ण करावी.

उ) जडवस्तु संग्रहातील निरुपयोगी वस्तू चे निर्लेखन आदेश काढणे :-

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उप विभाग क्रमांक १ ते ५, शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वि.अ.प्र -१०.०९/प्र.क.७०/२००८/विनियम, दिनांक १५ मे २००९ मधील भाग पहिला उप विभाग १ मधील अ.क्र. २३, नियम क्रमांक १४६ अन्वये जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू निर्लेखित करण्याचे अधिकार प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख, आणि कार्यालय प्रमुख यांना प्रदान करण्यात आलेले आहेत विभाग प्रमुखाला प्रत्येक प्रकरणी (प्रत्येक प्रकरण म्हणजे एका उपकरणाची मुळ खरेदी किंमत) रु. १,००,०००/- पर्यंत उपकरणे निर्लेखित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. प्रादेशिक

कार्यालय प्रमुख यांना प्रत्येक प्रकरणी रु. ६०,०००/- पर्यंत उपकरणे निर्लेखित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत आणि कार्यालय प्रमुखाला रु. ...०००/- पर्यंत उपकरणे निर्लेखित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. या अधिकारानुसार आपल्या आरोग्य संस्थेमधिल निर्लेखन पात्र जडवस्तु संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे निर्लेखन आदेश काढुन निर्लेखनाची कार्यवाही पुर्ण करावी.

१) रु. ३०,०००/- पर्यंत किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश कार्यालय प्रमुखांनी काढावेत.

२) रु. ६०,०००/- पर्यंत किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश काढण्याचे अधिकार प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांना आहेत. त्यामुळे कार्यालय प्रमुखांनी रु. ३०,०००/- ते ६०,०००/- पर्यंतच्या प्रत्येक प्रकरणी मुळ खरेदी किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे सविस्तर प्रस्ताव मंडळ उपसंचालक यांना पाठवुन अंतिम निर्लेखन आदेश प्राप्त करुन घ्यावेत.

३) रु. ६०,०००/- ते रु. १,००,०००/- पर्यंत किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे अंतिम निर्लेखन आदेश काढण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांना आहेत. त्यामुळे कार्यालय प्रमुखांनी रु. ६०,०००/- ते १,००,०००/- पर्यंतच्या प्रत्येक प्रकरणी मुळ खरेदी किंमतीच्या जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे सविस्तर प्रस्ताव मंडळ उपसंचालक यांचे मार्फत मा. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना पाठवुन अंतिम निर्लेखन आदेशप्राप्त करुन घ्यावेत व सदर प्रस्तावा मधिल निर्लेखित जडवस्तु संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे विक्री बाबत मा. संचालक यांची मंजूरी घ्यावी.

४) कार्यालय प्रमुखांनी रु. १,००,०००/- पेक्षा जास्त किंमत असलेल्या निर्लेखनपात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची (प्रत्येक प्रकरणी) अंतिम यादी तयार करावी. सदर यादी मंडळ उपसंचालक स्तरावरील गठित निर्लेखन समिती मार्फत छाननी करुन अंतिम यादी मंडळ उपसंचालक यांचे मार्फत आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना सादर करावी. सदर यादीतील अंतिम निर्लेखनपात्र जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे प्रस्ताव शासनास पाठवून, शासनाकडून अंतिम जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

## (ऊ) अंतिम निर्लेखित जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची हातची (अपसेट प्राईस) किंमत निश्चित करणे :-

१) अंतिम निर्लेखित जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची हातची किंमत काढण्यासाठी संस्था प्रमुखाच्या अध्यक्षते खाली कार्यालयातील राजपत्रीत अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात यावी. या समिती मध्ये प्रशासन / लेखाविषयक कार्यभार हाताळणाऱ्या अधिकाऱ्यांचा समावेश असावा. समिती मध्ये किमान तीन सदस्यांचा समावेश असावा.

२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक-डीएफपी १०९१/प्र.८/विनियम, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १८/६/१९९१ मधिल मुद्दा क्र. ३ मधिल अ, ब, किंवा क नुसार काळजीपुर्वक हातची किंमत निश्चित करावी. यानुसार समितीने निर्लेखित जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची हातची किंमत काढण्याची कार्यवाही करावी.

३) सदर हातची किंमत सिलबंद लिफाफा करुन संबंधित संस्था प्रमुखांनी मंडळ उपसंचालक यांच्या मंजूरीसाठी सादर करावी. सोबत आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

४) मंडळ उपसंचालक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन अंतिम निर्लेखित जडसंग्रहातील वस्तूंच्या हातच्या किंमतीस मंजूरी द्यावी.

५) संस्था प्रमुखांनी सदर हातची किंमत पुन्हा सिलबंद लिफाफा करुन मंडळ उपसंचालक यांचे कडे सुरक्षित ठेवण्यात यावी.

जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूची हातची (अपसेट प्राईस) किंमत काढणे व संबंधित मंडळ स्तरावरील समितीने मंजूरी बाबतची कार्यवाही १५ नोव्हेंबर, २०१४ पर्यंत पुर्ण करावी.

(ए) आरोग्य संस्था प्रमुखाने अंतिम निर्लेखित जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूचीविक्री करणेपुर्वी पुढील प्रमाणे प्रमाण पत्र लिलाव समिती अध्यक्षांकडे सादर करावयाचे आहे. तसेच एक प्रत प्रस्तावा बरोबर ठेवणेची आहे :-

"प्रमाणित करण्यात येते की, ———— मंडळातील ———— जिल्हयामधिल ———————— या आरोग्य संस्थे मधिल एकूण —— नग अंतिम निर्लेखित जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूआहेत. या पैकी —— नग विक्रीसाठी प्रस्तावित आहेत. या सर्व जडसंग्रह वस्तूबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देत आहे.

१) या सर्व जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूचेसर्व अंगांनी फोटो काढलेले आहेत.

२) या सर्व जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूवर कोणत्याही स्वरुपाचा कोणत्याही पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल नाही.

३) या सर्व जडवस्तूसंग्रहातील निरुपयोगी वस्तूवर कोणत्याही न्यायालयात कसल्याही स्वरुपाचे प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

४) या सर्व जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तूवर संबंधित कंपनीच्या उत्पादकाचा /त्याचा अधिकृत विक्रेता यांचाकोणत्याही स्वरुपाचा (उपकरणाचा निकृष्ठ दर्जा, सदोष पुरवठा इत्यादी- इत्यादीबाबत )दावा संस्था प्रमुखांकडे प्रलंबित अथवा न्यायप्रविष्ठ नाही.

५) सर्व जडसंग्रह वस्तूसंबंधी कोणतीही माहितीच्या अधिकारात माहीती मागीतलेली नाही.

(ऐ) जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी वस्तू विक्री बाबत महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक -डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक १८/६/१९९१ मधिले मुद्दा क्र.५ मधिल (एक) व (दोन) नुसार कार्यवाही करावी.

(एक) संबंधित प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील एका जिल्हयातील विविध स्थानिक कार्यालयाच्या एका आर्थिक वर्षात विक्री करावयाच्या सर्व वस्तूंची एकूण हातची किंमत रु.५०००/- पेक्षा जास्त नसेल तेव्हा त्या विभागाच्या जिल्हा पातळीवरील कार्यालय प्रमुखाने अशा सर्व कार्यालयाच्या वस्तूंचा लिलाव स्थानिक पातळीवर करावा. लिलावाच्या प्रसिध्दीची व्याप्ती, हातची किंमत, इत्यादी बाबतवित्त विभागाच्या दिनांक १८/६/१९९१ च्या परिपत्रकातील परिच्छेद २ व ३ मध्ये नमुद केलेल्या तत्वानुसार निर्णय घेण्यास जिल्हा पातळीवरील कार्यालय प्रमुख अशा प्रकरणा मध्ये सक्षम असतील.

(दोन) कोठल्याही एका प्रशासकीय विभागाच्या एका जिल्ह्यातील विविध स्थानिक कार्यालयाच्या एका आर्थिक वर्षात विक्री करावयाच्या सर्व वस्तूंची एकूण हातची किंमत रु. ५०००/- पेक्षा जास्त असेल तेव्हा लिलावाच्या, प्रसिध्दीची व्याप्ती, हातची किंमत, लिलावाचे स्थळ व दिनांक इत्यादी बाबत निर्णय घेण्या करीता एक समिती नियुक्त करण्यात यावी. संबंधित विभागाच्या नियंत्रणा खालील जेष्ठतम प्रादेशिक विभाग प्रमुख हे अशा समितीचे अध्यक्ष असावे. व संबंधित विभागाने निवडलेले अन्य दोन अधिकारी समितीचे सदस्य असावेत. समितीने घेतलेल्या निर्णयानुसार लिलाव पार पाडण्याची व्यवस्था जेष्ठतम विभाग प्रमुखाने करावी.

आरोग्य विभागात राज्यस्तरावरील आरोग्य संस्थांची संख्या जास्त आहे. त्यामुळे सर्व वस्तूंची हातची किंमत रु. ५०००/- पेक्षा जास्त राहणार आहे. ही बाब विचारात घेऊन जेष्ठतम प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणजेच विभागीय उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येत आहे. त्यात पुढील सदस्यांचा समावेश राहील.

| | | |
|---|---|---|
| १) उपसंचालक विभागीय मंडळ | - | अध्यक्ष |
| २) सहाय्यक संचालक (वैद्यकीय) | - | सदस्य |
| ३) मुख्य प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य |
| ४) संबंधित जिल्ह्याचे जिल्हा शल्य चिकित्सक | - | सदस्य |
| ५) जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील मुख्य /प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य संचिव |

ओ) प्रत्यक्ष लिलावानंतर खरेदीदाराने साहित्याची उचल केल्यानंतर साठासंग्रह नोंदवहीत तशी नोंद घेऊन साहित्य कमी करण्यात यावे.

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक,
आरोग्य सेवा, मुंबई.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :
मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(कुटुंब कल्याण) पुणे.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(सामाजिक बांधिलकी) मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(मानसिक आरोग्य) मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा(एडस्) मुंबई.
सह संचालक, आरोग्य सेवा(हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे.
सह संचालक, आरोग्य सेवा(कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा(प्रभारी मंडळ) सर्व.
२/- आपले स्तरावरुन संबंधित संस्थाप्रमुखांना वरीलप्रमाणे कार्यवाही मे २०११ अखेर पूर्ण करण्याबाबत उचित निर्णय देण्यात यावेत तसेच वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.
प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी -
उपसंचालक, आरोग्य सेवा(आय ई सी ब्युरो) पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा(आमाजिआ) पुणे.

उपसंचालक, आरोग्य सेवा(रा.आ.प्र.शा.) सर्व
उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन) पुणे
प्रत कार्यवाहीसाठी.
जीव वैद्यकीय अभियंता, विभागीय आरोग्य साधने सामुग्री देखभाल व दुरुस्ती कार्यशाळा सर्व.

२/- परिपत्रकामध्ये नमूद कार्यवाही लवकरात लवकर करण्यासाठी मंडळातील आरोग्य संस्थाप्रमुखांना आवश्यक सहकार्य करण्यात यावे.



१७७

संगणक, प्रिंटर, लॅपटॉप, सर्व्हर व इतर आयटी उपकरणांचे आयुष्यमान (Life) ठरविणे व कालबाह्य झालेल्या उपकरणांची विल्हेवाट लावणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक मातंसं /नस्ती ०७ /प्रक्र-८९ /३९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक — ४ जानेवारी, २००८.

वाचा:- सा.प्र.वि १) शासन निर्णय क्रमांक सिओइन१०९८/प्र.क्र.२१२/९८/३९, दिनांक: ५ ऑक्टोबर २००१
२) शासन निर्णय क्रमांक सिओइन१०९८/प्र.क्र.२१२/९८/३९, दिनांक: ५ ऑक्टोबर २००२
३) शासन निर्णय, क्रमांक सिओरम २००४/प्रक्र४३६/३९, दिनांक १७ मे २००६

प्रस्तावना:-

माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करुन राज्याचे प्रशासन अधिक गतीमान, लोकाभिमुख आणि पारदर्शक करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कामकाजाचे संगणकीकरण करण्याचे शासनाने धोरण निश्चित केले आहे. शासनाच्या संगणकीकरणाच्या धोरणानुसार शासनाच्या सर्व विभागात व विभागातील कार्यालयात संगणकीकरणाची कार्यवाही करण्यात आली आहे. संगणक व तदनुषंगीक आयटी उपकरणे काही काळात निरुपयोगी होतात, त्यांचे सुटे भाग बाजारात उपलब्ध नसतात म्हणून त्यांची दुरुस्ती करणे अशक्य होते.

उपरोक्त दि. १७.५.२००६ च्या शासन निर्णयाद्वारे मात्र सन १९९८-९९ या वर्षी मंत्रालय व नवीन प्रशासकीय भवनात स्थापित असलेले संगणक व तदनुषंगीक उपकरणांची विल्हेवाट लावण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आली होती. सन १९९८-९९ नंतरच्या कालावधीत किंवा त्यापुर्वी मंत्रालय व नवीन प्रशासकीय भवनात व या क्षेत्रीय कार्यालयात स्थापित केलेल्या अशा उपकरणांबाबत निर्णय घेण्यात आलेला नव्हता.

माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात झपाट्याने होत असलेली सुधारणा लक्षात घेता संगणक व इतर आयटी उपकरणांचे आयुष्य निर्धारित करणे, निर्धारित आयुष्यापेक्षा जास्त आयुष्य असलेली उपकरणे निर्लेखित करणे व निर्लेखित केलेल्या उपकरणांची विल्हेवाट लावण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

माहिती तंत्रज्ञान विषयक धोरण तसेच संगणकीकरण कृती कार्यक्रम राबविण्यासाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या 'उच्चाधिकार समितीस दिनांक ५.१०.२००२ च्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये 'माहिती तंत्रज्ञान विषयक सर्व बाबींना मान्यता देण्याचे अधिकार' देण्यात आलेले आहेत. वरील प्रस्तावाबाबत निर्णय घेण्यासाठी दि. १३ नोव्हेंबर २००७ च्या उच्चाधिकार समितीची बैठक झाली व त्यात सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून घेतलेल्या निर्णयान्वये शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :

शासन निर्णय:-

१) संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्व्हर व इतर सर्व आयटी संबंधित उपकरणांचे वयोमान ६ वर्ष निश्चित करण्यात येत आहे.

२) संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्व्हर व इतर सर्व आयटी संबंधित उपकरणे ज्यांचे वयोमान ६ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त झाले आहे अशी उपकरणे कालबाह्य झाल्याने निर्लेखित करण्यायोग्य ठरविण्यात येत आहे.

३) कालबाह्य झालेल्या उपकरणांची विल्हेवाट लावण्यासाठी सर्वप्रथम सक्षम अधिकारी निर्लेखन आदेश काढतील. तसेच त्याची नोंद जडवस्तुसंग्रह नोंद वहीमध्ये घेतील. अनुदानाच्या उपलब्धतेनुसार उपकरणाच्या निर्लेखनाबाबत योग्य ते निर्णय घ्यावेत.

४) मंत्रालयीन सर्व विभागात व त्यांचे क्षेत्रीय कार्यालयात संगणक व तदनुषंगिक बाबींबाबत वेगळ्याने जडवस्तुसंग्रह नोंद वही (Hard copy or Electronic form) ठेवावी. सदर वहीत असलेल्या संगणक व तदनुषंगिक बाबींची नोंद वर्षनिहाय ठेवावी व कोणत्यावर्षी किती साहित्य निर्लेखित होईल या आकडेवारीवरुन आवश्यक रक्कमेची मागणी वार्षिक अर्थसंकल्पात करावी.

५) कालबाह्य व निर्लेखित झालेल्या उपकरणांची विल्हेवाट लावण्यासाठी अपेक्षित किंमत (upset price) ठरविण्यासाठी, उपकरणाच्या मुळ किंमतीतून दरवर्षी ६०% (Written Down Value) या पद्धतीने घसारा कमी करून (diminishing) किंमत काढण्यात येईल व काढण्यात आलेली किंमत नजिकच्या रु १००/- च्या पुर्णांकाएवढी धरण्यात येईल.

६) वरील प्रमाणे ठरविलेल्या अपेक्षित किंमतीवर निर्लेखित केलेली उपकरणे घेण्याचा प्रथम हक्क निर्लेखनापुर्वी ती उपकरणे ज्यांच्या वापरात होती त्यांचाच राहिल. याबाबतचे आदेश संबंधित विभागातील सक्षम अधिकारी निर्गमित करतील. मात्र ज्या उपकरणाचा वापर एका व्यक्तीकडुन होत नसून पुर्ण विभागासाठी होत असेल, अशा उपकरणांबाबतचा हक्क संबंधित विभागातील अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव हे ठरवतील. ज्या अधिकारी /कर्मचारी यांना प्रथम हक्क देण्यात आला व त्यांनी उपकरणे घेण्यास लेखी नकार दिल्यास त्याबाबतचा हक्क संबंधित विभागानी त्यांच्या विभागातील इतर अधिकारी /कर्मचारी यांना लेखी आदेश काढुन द्यावा. ते उपकरण घेण्यास कोणीही तयार नसल्यास निविदा पध्दतीने त्याची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावी.

७) मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील ज्या अधिकारी / कर्मचा-यांना उपकरण घेण्याचा प्रथम हक्क देण्यात आला आहे त्यांनी उपकरणाची निर्धारीत किंमत त्यांचे विभागाच्या रोख शाखेत भरावी. संबंधित रोख शाखा सदर रक्कमेचा भरणा एकत्रितरित्या माहीती तंत्रज्ञान संचालनालयाच्या रोखशाखेत करून तसे प्रमाणपत्र घेतील. रक्कमेचा भरणा केल्यानंतर संबंधित विभागाच्या रोख शाखा सिएमएस चे प्रोजेक्ट मॅनेजर यांचेशी संपर्क साधुन सदर उपकरणातील शासनाची आवश्यक माहिती व सर्व आज्ञावल्या काढुन घेण्याबाबतची कार्यवाही करतील आणि त्या आशयाचे प्रमाणपत्र संबंधिताकडुन घेतील. त्यानंतर ते उपकरण संबंधितांना आहे त्या स्थितीत हस्तांतरीत करतील आणि त्याच्या गेटपास बाबत आवश्यक ती कार्यवाही करतील. क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांबाबत वरील प्रमाणे कार्यवाही संबंधित सक्षम अधिका-याकडुन तांत्रिक समिती गठण करून करण्यात यावी.

८) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना पुरविलेल्या संगणक व तदनुषंगिक बाबींच्या विक्रीतुन प्राप्त झालेल्या रक्कमेचा भरणा, माहिती तंत्रज्ञान संचालनालयातील रोख शाखा, योग्य शीर्षाखाली शासकीय कोषागारात चलनाने करतील. क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांनी याबाबत त्यांचेस्तरावर योग्य ती कार्यवाही करावी

९) विक्रीस घेतलेले उपकरण संबंधितांना हस्तांतरित करीत असताना सदर उपकरणांवर काही कर उद्भवल्यास त्याबाबत विभागाची जबाबदारी राहणार नाही व वाहतुक आणि जकात इत्यादी बाबतचा खर्च संबंधितांना करावा लागेल असे स्पष्ट करावे.

१०) संबंधित विभागाच्या आस्थापना शाखेने / संगणक शाखेने जड वस्तु संग्रह नोंद वहीत सदर विक्रीबाबत नोंद घ्यावी.

(११) वरील धोरण सर्व क्षेत्रीय कार्यालयांना व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील आस्थापनांनाही लागु करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील असलेल्या उच्चाधिकार समितीला शासन निर्णय सिओएम१०२८/प्र.क्र.२१२/२८/३९, दिनांक ५ ऑक्टोबर २००१ व दि. ५ ऑक्टोबर, २००२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये व दि.१३ नोव्हेंबर,२००७ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे. उपरोक्त शासन निर्णय दिनांक ५.१०.२००१ च्या परिच्छेद ३ नुसार "उच्चाधिकार समितीने दिलेली मान्यता म्हणजेच माहिती तंत्रज्ञान, नियोजन, व वित्त विभागांनी मान्यता दिली आहे".

या शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०१०४१७२५५६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ.प्र.सिंह)
शासनाचे सह सचिव,तथा संचालक (माहिती तंत्रज्ञान)

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्यसचिव यांचे खाजगी सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,(विधान परिषद /विधान सभा),मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / लेखा कोष भवन वांद्रे (पू.) मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषद/महानगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई ४०० ००४, संचालक,शासकीय मुद्रण व लेखनसामग्री,मुंबई
विशेष आयुक्त व प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,महाराष्ट्र सदन,कोपरनिकस मार्ग,नवी दिल्ली
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती (२ प्रती).

विभागातंर्गत निर्लेखित वाहेन, रुग्णालयीन आणि शितसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाव्दारे विल्हेवाट लावण्यासाठी NIC कडील ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीचा वापर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१६/ प्र.क्र.१२१/ आरोग्य-४
मंत्रालय, १० वा मजला, कॉम्पलेक्स बिल्डींग,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीख: १८ ऑक्टोबर, २०१७.

<u>वाचा</u>

१) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र.मातंसं-०८०/६/२०१३-DIR-DIT(MH)/३९, दि.३.१२.२०१४
२) शासन निर्णय, सा.आ.वि., क्रमांकः खरेदी-२०१२/लिलाव/९६६/प्र.क्र.२१२/आरोग्य-४, दि.२५.०२.२०१५.
३) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र, क्रमांकः संआसे/कक्ष-१५/टे-१/NIC ई-लिलाव प्रस्ताव/न.क्र.१३२३-२४/२०१६, दि.२४.१०.२०१६.

<u>शासन निर्णय</u>

विभागांतर्गत निर्लेखित निकामी वाहने व त्यांचे नादुरुस्त सुटे भाग याची हातची किंमत ठरविण्यासाठी संदर्भाधीन अनुक्रमांक २ च्या शासन निर्णय दि.२५.०२.२०१५ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. तसेच संदर्भ क्र.१ अन्वये विभागाच्या नियंत्रणाखालील विविध आरोग्य संस्थांकडील निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शितसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाव्दारे विल्हेवाट लावण्यासाठी केंद्र शासन अंगिकृत MSTC महामंडळाची नामनिर्देशनाने नियुक्त करण्यास सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान संचालनालय शासन निर्णय दि.३.१२.२०१४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या संदर्भाधीन क्र.३ च्या प्रस्तावानुसार निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शितसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाव्दारे विल्हेवाट लावण्यासाठी शासन खालीलप्रमाणे समित्या पुनर्गठीत करीत आहे.

त्याअनुषंगाने राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC) यांनी विकसित केलेले ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीव्दारे ई-लिलाव कार्यप्रणाली राबविण्यासाठी खालील बाबींना शासन मान्यता देणे आवश्यक राहील.

१) राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC) यांची ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीव्दारे विभागाच्या नियंत्रणाखालील विविध आरोग्य संस्थांकडील निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाव्दारे विक्री करण्यासा शासन मान्यता प्रदान करणे.
२) विभागाच्या वतीने उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे यांची मुख्य नोडल अधिकारी म्हणून राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC) यांच्याकडे नोंदणी करण्यास मान्यता प्रदान करणे. तसेच उपसंचालक,

आरोग्य सेवा (परिवहन), पुणे हे विभगांतर्गत ई-लिलाव पध्दतीने संनियंत्रण करणे तांत्रिक सल्ला देणे, ई-लिलावाबाबतच्या माहितीचे संकलन करणे आणि राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC) व क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी/विविध समित्यांमध्ये समन्वय राखणे, इत्यादी करीता आवश्यक कार्यवाही करतील.

३) विभागाच्या क्र.खरेदी-२०१२/९६६/प्र.क्र.२१२/आरोग्य-४, दि.२५.०२.२०१५ अन्वये विभागाच्या नियंत्रणाखालील विविध आरोग्य संस्थांकडील निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची लिलावाव्दारे विक्री करण्यासाठी नामनिर्देशनाने केंद्र शासन अंगिकृत MSTC महामंडळाची केलेल्या नियुक्तीच्या अनुषंगाने शासनाने पुनर्गठीत केलेल्या समित्या खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत.

**(अ) जिल्हास्तरावर निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शितसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांचे लॉट ठरविण्यासाठी समिती**

| | जिल्हा शल्य चिकित्सक स्तर | | | जिल्हा आरोग्य अधिकारी स्तर | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा शल्य चिकित्सक | -अध्यक्ष | १ | जिल्हा शल्य चिकित्सक | -अध्यक्ष |
| २ | सेवा अभियंता/तंत्रज्ञ | -सदस्य | २ | सेवा अभियंता/तंत्रज्ञ | -सदस्य |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | -सदस्य सचिव | ३ | प्रशासकीय अधिकारी | -सदस्य सचिव |

**(ब) अंतिम निर्लेखित वाहने, सुटे भाग, साहित्य यांची हातची किंमत ठरविण्यासाठी समिती**

१) सहाय्यक संचालक (वैद्यकीय), उपसंचालक, विभागीय मंडळ, आरोग्य सेवा - अध्यक्ष
२) सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (परिवहन), - सदस्य
३) मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळ - सदस्य
४) संबंधित जिल्ह्यातील जिल्हा शल्य चिकित्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य
५) सेवा व्यवस्थापक (संबंधित मंडळातील) - सदस्य सचिव

**(क) अंतिम निर्लेखित रुग्णालयीन व शीतसाखळी उपकरणे आणि इतर साहित्य यांची हातची किंमत ठरविण्यासाठी समिती**

१) सहाय्यक संचालक (वैद्यकीय), उपसंचालक, विभागीय मंडळ, आरोग्य सेवा - अध्यक्ष
२) सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (परिवहन), - सदस्य
३) मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळ - सदस्य
४) संबंधित जिल्ह्यातील जिल्हा शल्य चिकित्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य
५) जीव वैद्यकीय अभियंता, आरोग्य साधन सामुग्री दुरुस्ती व देखभाल कार्यशाळा (एचईएमआर) उपसंचालक, आरोग्य सेवा विभागीय मंडळ - सदस्य सचिव

(ड) जिल्हास्तरावरील ई-लिलाव समिती

| | | |
|---|---|---|
| १) | संबंधित जिल्ह्यातील जिल्हा शल्य चिकित्सक/जिल्हा - | - अध्यक्ष |
| २) | सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (परिवहन) | - सदस्य |
| ३) | सेवा अभियंता, आरोग्य सेवा (परिवहन)/तंत्रज्ञ | - सदस्य |
| ४) | संबंधित कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी | - सदस्य सचिव |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१७१६१५५३४९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Pradip M Balkavde
Date: 2017.10.18 11:53:14 +05'30'

**प्र.मो.बलकवडे**
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. महालेखापाल,१/२ महाराष्ट्र( लेखा व लेखापरिक्षा )/ ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई/ नागपूर.
४. आयुक्त, कुटुंब कल्याण आणि संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा ( कुटूंब कल्याण, माता बालसंगोपन व शालेय आरोग्य),पुणे.
७. सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई.
८. सहाय्यक संचालक ( लेखा व लेखापरिक्षा ), आरोग्य सेवा, पुणे.
९. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन ), पुणे.
१०. उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे
११. उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
१२. अवर सचिव (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती( आरोग्य-४ ), सा.आ.वि.

महाराष्ट्र शासन

# उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन), पुणे.

| | | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्र. (वै) (०२०) २६०५८५२५ | कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक (०२०) २६०५८३७३ (०२०) २६०५८९१२ | उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), ८ केनडी रोड, नायडू हॉस्पीटल कंपाऊंड, पुणे- ४११ ००१ यांचे कार्यालय. कार्यालयीन फॅक्स क्रमांक : (०२०) २६०५८३७८ ई-मेल आयडी : ddhstransport@gmail.com |
| आरोग्य सेवा | | |
| **महत्वाचे परिपत्रक** | जा.क्र.आसेप/तांत्रिक विभाग/कक्ष ११८(१)/निर्लेखित वाहने, साहित्याची हातची किंमत ठरविणे, ई-लिलाव करणे/८८७६-८०५८/२०१७, दिनांक : २८ डिसेंबर, २०१७. | |

प्रति,
उपसंचालक, आरोग्य सेवा,
प्रभारी मंडळ, सर्व.

**विषय :-** **सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील विविध आरोग्य संस्थांकडील निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्यासाठी NIC कडील ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीचा वापर करण्या बाबत ...**

**निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची हातची किंमत निश्चित करणे आणि ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावणे...**

**संदर्भ :-**
१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१६/प्र.क्र. १२१/आरोग्य-४, दिनांक : १८ ऑक्टोबर, २०१७.
२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.आसेप/ तांत्रिक विभाग/ कक्ष ११८(१)/ NIC/ e-Auction Training/८०६३-८१५१/२०१७, दिनांक : १६ नोव्हेंबर, २०१७.
३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.आसेप/ तांत्रिक विभाग/ कक्ष ११८(१)/शानि-NIC/शुध्दीपत्र/७९८१-८३/२०१७, दिनांक : ०९ नोव्हेंबर, २०१७.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत विविध स्तरावरील आरोग्य संस्थांकडे पडून असलेली निर्लेखित वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्यासाठी NIC कडील ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीचा वापर करण्यास संदर्भ क्रमांक १ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच ई-लिलाव कार्यप्रणालीचा वापर करण्यासाठी प्रस्तूत शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर लॉट ठरविण्याची समिती, हातच्या किंमती काढण्यासाठीची समिती आणि प्रत्यक्ष ई-लिलाव करण्यासाठीच्या समित्यांचे पुर्नगठण करण्यात आलेले आहे.

आपले मंडळातील अंतिम निर्लेखित वाहने, निरुपयोगी टायर्स-ट्युब, बॅटरीज्, सुटे भाग, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची NIC कडील ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीचा वापर करुन ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्यासाठी त्वरीत कार्यवाही करण्यात यावी, हि सस्नेह विनंती.

निर्लेखित वाहने, निरुपयोगी टायर्स-ट्युब, बॅटरीज्, सुटे भाग, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांची ई-लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्यासाठी संदर्भीय शासन निर्णयान्वये गठित केलेल्या समित्यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

➢ **अंतिम निर्लेखित साहित्याची हातची किंमत ठरविण्याच्या समितीने करावयाची कार्यवाही :-**

१) मंडळातील निर्लेखित वाहने, निरुपयोगी टायर्स-ट्युब, बॅटरीज्, सुटे भाग, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य, इत्यादी यांचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात यावा.

२) संदर्भ क्रमांक १ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये आपले मंडळातील निर्लेखित साहित्याची हातची किंमत काढण्यासाठी आपले कार्यालयात कार्यरत सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकिय) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीचे सदस्य सचिव निर्लेखित वाहने, निरुपयोगी टायर्स-टयुब, बॅटरीज्, सुटे भाग यासाठी सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा आणि रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यासाठी जीव वैद्यकिय अभियंता, एचईएमआर, कार्यशाळा हे आहेत. सदर समितीने पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

- सर्व निर्लेखित साहित्य जिल्हा मुख्यालयात / विभागीय स्तरावर / विभागाच्या दृष्टीने सोईच्या सुरक्षित ठिकाणी लॉटनिहाय स्वतंत्र क्रमांकासह ठेवण्याचे नियोजन करावे.
- सर्व निर्लेखित साहित्याच्या अंतिम निर्लेखन आदेशाची स्वतंत्र नस्ती तयार करावी. यात सर्व अंतिम निर्लेखित वाहनांचे आरसीटिसी पुस्तक उपलब्ध करुन ठेवण्यात यावेत.
- वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक डीएफपी १०९१/ प्र.८/ विनियम, दिनांक १८/०६/१९९१ मध्ये लिलावापूर्वी विक्रीच्या वस्तूंची हातची किंमत (अपसेट प्राईस) निश्चित करण्यासाठी ठरविण्यात आलेल्या तत्वानुसार सदर साहित्याची हातची किंमत, संदर्भीय शासन निर्णयानुसार पुर्नगठीत केलेल्या समितीमार्फत काढण्यात यावी.
- सदर हातची किंमत गोपनियरित्या सिलबंद पाकिटात बंद करुन समितीने आपणाकडे सादर करावी.
- आपणाकडून सदर हातची किंमतीचा लिफाफा तपासून, त्यास मंजूरी देण्यात यावी. हातची किंमत मंजूर केल्यानंतर हातच्या किंमतीची गोपनियता राखण्यासाठी आणि ई-लिलावाची प्रक्रिया त्वरीत होण्यासाठी सदर हातची किंमतीचा लिफाफा सिलबंद करुन गोपनियरित्या संबंधित जिल्हास्तरीय ई-लिलाव समितीकडे हस्तांतरीत करावा.

➢ **जिल्हास्तरावर अंतिम निर्लेखित साहित्याचे लॉट ठरविण्याच्या समितीने करावयाची कार्यवाही :-**

१) सर्व निर्लेखित साहित्याची तपशिलवार माहिती जिल्हास्तरावरील लॉट ठरविण्याच्या समितीने एकत्रित करावी.

२) निरुपयोगी टायर्स-टयूब, बॅटरिज् व निकामी सुटे भाग जिल्हास्तरावर एकत्रित करण्यात यावेत. निरुपयोगी टायर्स-टयुबचा एक लॉट, बॅटरिजचा एक लॉट व निकामी सुटया भागांचा एक लॉट, अशाप्रकारे जिल्हानिहाय स्वतंत्र लॉट करण्यात यावेत.

३) जिल्हा स्तरावरील आणि विभागीय स्तरावरील कार्यशाळांमध्ये जमा असलेले जळके ऑईल (वंगण) आवश्यकतेनुसार जिल्हा हिवताप कार्यालयास उपलब्ध करुन द्यावे.

४) रुग्णालयीन आणि शीत साखळी उपकरणे व इतर साहित्य शक्य असल्यास जिल्हयात एका ठिकाणी अथवा विभागाच्या दृष्टीने सोईच्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात यावीत.

५) प्रत्येक लॉटमध्ये असलेल्या साहित्याची अचूक संख्या, वजन तपशिलात नमूद करणे आवश्यक आहे.

६) प्रत्येक लॉटवर लॉट क्रमांक सुस्पष्ट अक्षरात रंगविणे किंवा चिकटविणे आवश्यक आहे.

७) लॉट क्रमांक टाकल्यानंतर, लॉट क्रमांक दिसेल अशा पध्दतीने सदर लॉटचे चारही बाजून (३६०° मध्ये) स्पष्ट रंगीत फोटो घ्यावेत. शक्यतो लॉट जवळ जवळ ठेवू नयेत. जेणे करुन लॉटची विक्री केल्यानंतर लॉट हस्तांतरीत करताना गोंधळ होणार नाही.

➢ <u>जिल्हास्तरावरील ई-लिलाव समितीने करावयाची कार्यवाही :-</u>

१) संदर्भ क्रमांक १ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये गठित केलेल्या जिल्हास्तरावरील ई-लिलाव समितीमार्फत ई-लिलावाद्वारे निर्लेखित साहित्याची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२) निर्लेखित वाहने, निरुपयोगी टायर्स-टयुब, बॅटरीज् व निकामी सुटेभाग यासाठी स्वतंत्र ई-लिलाव करण्यात यावा. तसेच रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यासाठी स्वतंत्र ई-लिलाव करण्यात यावा.

३) सोबत जोडलेल्या नमून्यानुसार वृत्तपत्रात प्रसिध्दीकरिता ई-लिलाव सुचना तयार करुन, स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द् करावी. यांमध्ये खालीनमूद केल्यानुसार निर्णायक तारखांचे (Critical Dates) वेळापत्रक नमूद करणे आवश्यक आहे (सर्व तारखा कार्यालयीन कामकाजाच्या दिवशीच आणि कार्यालयीन कामकाजाच्या वेळतच असतील याची दक्षता घ्यावी).

- **ई-लिलाव प्रसिध्दीची तारीख व वेळ,**
- **इच्छूक खरेदीदारांचे दस्ताऐवज अपलोड करण्यासाठी सुरुवात करण्याची तारीख व वेळ,**
  (सदर तारीख ई-लिलाव प्रसिध्द् केला त्यां दिवाशीच ठेवावी, वेळेत अर्ध्या तासाचा फरक ठेवावा)
- **इच्छूक खरेदीदारांचे दस्ताऐवज अपलोड करण्यासाठीची अंतिम तारीख व वेळ,**
  (सदर तारीख दस्ताऐवज अपलोड करण्यास सुरुवात करण्याच्या तारखेपासून पुढे सात कामाच्या दिवसांनंतरची ठेवावी)
- **अपलोड केलेल्या इच्छूक खरेदीदारांच्या दस्ताऐवजांना मान्यता देण्यास सुरुवात करण्यासाठीची तारीख व वेळ,**
  (सदर तारीख दस्ताऐवज अपलोड करण्यसाठीच्या अंतिम तारखेलाच ठेवावी, वेळेत एक तासाचा फरक ठेवावा)
- **अपलोड केलेल्या इच्छूक खरेदीदारांच्या दस्ताऐवजांना मान्यता देण्यासाठींची अंतिम तारीख व वेळ,**
  (सदर तारीख अपलोड केलेल्या दस्ताऐवजांना मान्यता देण्यास सुरुवात करण्याच्या तारखेपासून पुढे आठ कामाच्या दिवसांनंतरची ठेवावी)
- **ई-लिलावास प्रत्यक्ष सुरुवात होणारी तारीख व वेळ,**
  (सदर तारीख अपलोड केलेल्या दस्ताऐवजांना मान्यता देण्यासाठीच्या अंतिम तारखेच्या लगतच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेस सुरुवात होते तेव्हाची १०.०० ठेवावी)
- **ई-लिलाव संपर्ण्याची तारीख व वेळ,**
  (सदर तारीख प्रत्यक्ष ई-लिलावास सुरुवात झाल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या तिसऱ्या दिवशी, दुपारी १५.०० वाजेपर्यंत ठेवावी)
- **करारनामा (Award of Contract) देण्याची तारीख.**
  (ई-लिलाव समितीने प्राप्त बोलीचे मुल्यांकन करुन सर्वाधिक बोली लावणारा खरेदीदार निश्चित करण्याची कार्यवाही प्रत्यक्ष ई-लिलाव संपल्यानंतर शक्य असल्यास त्याच दिवशी किंवा लगतच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करावी. सर्वाधिक बोली लावणारा खरेदीदार निश्चित झाल्यानंतर, त्याची बोली मान्य केल्याबाबतचा करारनामा **Award of Contract (AOC)** तयार करुन http://eauction.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.

४) ई-लिलावासाठी e-Auction Papers तयार करताना इसारा रक्कम लॉटच्या हातच्या किंमतीच्या १ टक्का एवढी ठेवावी. सदर रक्कम लगतच्या पुढच्या शतकी संख्येएवढी ठेवावी, उदा.लॉटची किंमत रु.१५,०००/- असल्यास इसारा रक्कम रु.१५०/- येते. सदरची रक्कम लगतच्या पुढच्या शतकी संख्येएवढी म्हणजे, रु.२००/- एवढी ठेवावी.

लॉटच्या बोलीची वाढीची किंमत (Incremental Value) पुढील क्रमानुसार ठेवण्यात यावी.

| अ.क्र. | लॉटची किंमत (Upset Price) | वाढीची किंमत (Incremental Value) |
|---|---|---|
| १ | रु.५०,०००/- पर्यंत | रु.१,०००/- |
| २ | रु.५०,००१/- ते रु.१,५०,०००/- पर्यंत | रु.२,५००/- |
| ३ | रु.१,५०,००१/- ते रु.३,००,०००/- पर्यंत | रु.४,०००/- |
| ४ | रु.३,००,००१/- ते रु.५,००,०००/- पर्यंत | रु.५,०००/- |
| ५ | रु.५,००,००१/- च्या पुढे | रु.१०,०००/- |

) NIC कडील ई-लिलाव आज्ञावली या संगणक प्रणालीचा वापर करण्यासाठी http://eauction.gov.in या संकेतस्थळावर ई-लिलाव प्रसिध्द करण्यासाठी प्रथम सोबत जोडलेल्या नमून्यानुसार **Auction Input Form** भरणे आवश्यक आहे.

) ई-लिलावासाठी **e-Auction Papers** तयार करण्यासाठीचा नमूना सोबत जोडलेला आहे सदर नमून्यात कार्यालयनिहाय आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

) ई-लिलावाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी या कार्यालयामार्फत दिनांक २० व २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी आयोजित केलेल्या प्रशिक्षण सत्रात संबंधित विभागीय व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना NIC मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.तुषार कोळी यांनी संगणकीय सादरीकरण आणि Live e-Auction Demo च्या माध्यमातून आवश्यक माहिती दिलेली आहे. तसेच सदर सादरीकरणाची सॉफ्ट कॉपीही सर्व उपस्थितांस हस्तांतरीत केलेली आहे. तसेच आपल्या विभागातील सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन) आणि जीव वैद्यकिय अभियंता, एचईएमआर कार्यशाळा यांचेकडेही सदर सादरीकरणाची सॉफ्ट कॉपीही उपलब्ध आहे.

) सदर ई-लिलावाच्या प्रक्रियेदरम्यान काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास NIC मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.तुषार कोळी यांना पुढिल क्रमांकावर संपर्क साधावा ९७०२८६०८५८.

०)ई-लिलावामध्ये विक्री केलेली वाहने हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर वाहनांचे मालकी हक्क संबंधित खरेदीदाराच्या नावे हस्तांतरीत करण्याची जबाबदारी ई-लिलाव समितीची राहील. त्यासाठी वाहन हस्तांतरण करण्यापूर्वी संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयात फॉर्म नं २८, २९ व ३० पूर्ण भरुनही वाहनाचे मालकी हक्क हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करण्याबाबत दक्षता घ्यावी.

१)ई-लिलावाद्वारे विक्री केलेले साहित्य विहित मुदतीत संपुर्ण रक्कम भरल्यानंतर संबंधित खरेदीदारास हस्तांतरीत करावयाची कार्यवाही जिल्हास्तरीय ई-लिलाव समितीमार्फत करण्यात यावी.

२)ई-लिलावाद्वारे निर्लेखित साहित्याची विक्री झाल्यानंतर प्राप्त होणारी पुर्ण रक्कम शासनाच्या खालील लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.

०२१० वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०४ सार्वजनिक आरोग्य
८०० इतर जमा रकमा
(०४) जडवस्तू व इतर वस्तू यांचे विक्रीपासून मिळणारे उत्पन्न
**०२१००६२५**

आपले तात्काळ संदर्भासाठी पुढीलप्रमाणे कागदपत्रे आपणास सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

(अ) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१६/प्र.क्र.१२१/आरोग्य-४, दिनांक : १८ ऑक्टोबर, २०१७.

(ब) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक डीएफपी १०९१/प्र.४/विनियम, दिनांक : १८ जून, १९९१.

विषयांकित कार्यवाहीमध्ये कोणतीही अडचण असल्यास या कार्यालयातील सहाय्यक संचालक, श्री.जे. जी.मुळे यांचेशी कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२०-२६०५८३७३/२६०५८३७८ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

तसेच याठिकाणी नमूद करण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत असलेल्या निर्लेखनपात्र वाहने, रुग्णालयीन आणि शीतसाखळी उपकरणे व इतर साहित्य यांचे अंतिम निर्लेखनाचे आदेश काढण्याची कार्यवाही लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीनेही नियोजन करण्यात यावे, ही विनंती. जेणेकरुन सदर साहित्य अंतिम निर्लेखित केल्यानंतर, सदर साहित्याची ई-लिलावाद्वारे विक्री करणे शक्य होऊन, सदर साहित्याने व्यापलेली आरोग्य संस्थांची जागा रिकामी होईल.

कृपया विषयांकित कार्यवाहीस प्रथम प्राधान्य देण्यात यावे. हि सस्नेह विनंती.

(वि. ए. गायकवाड)
उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन),
पुणे-४११ ००१.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३) मा.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

प्रत :- सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकिय), कार्यालय उपसंचालक, प्रभारी मंडळ सर्व तथा अध्यक्ष, हातची किंमत ठरविण्याची समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा/सामान्य रुग्णालय, सर्व तथा अध्यक्ष, लॉट ठरविण्याची समिती आणि अध्यक्ष जिल्हास्तरावरील ई-लिलाव समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व तथा अध्यक्ष, लॉट ठरविण्याची समिती आणि अध्यक्ष, जिल्हास्तरावरील ई-लिलाव समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), सर्व तथा सदस्य सचिव, हातची किंमत ठरविण्याची समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

प्रत :- जीव वैद्यकिय अभियंता, एचईएमआर कार्यशाळा, कार्यालय उपसंचालक, प्रभारी मंडळ सर्व सदस्य सचिव, हातची किंमत ठरविण्याची समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- प्रशासकीय अधिकारी, जिल्हा/सामान्य रुग्णालय, सर्व तथा सदस्य सचिव, लॉट ठरविण्याची समिती आणि सदस्य सचिव, जिल्हास्तरावरील ई-लिलाव समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- प्रशासकीय अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सर्व तथा सदस्य सचिव, लॉट ठरविण्याची समिती आणि सदस्य सचिव, जिल्हास्तरावरील ई-लिलाव समिती यांना माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.